RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984

*Fourth Year Issue - XV*

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

*(A Quarterly Journal)*

July - September 2016

Peer Reviewed and Refereed Journal

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL SCIENCES**

Post Box No. 23

Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517

E-mail:- manavlok1999@gmail.com

Websit :- www.manavlok.org

MANAVLOK RESEARCH BULLETIN

RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN – 2349-3984

FOURTH YEAR ISSUE –XV

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A QUARTERLY JOURNAL)

JULY – SEPTEMBER 2016

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL SCIENCES, AMBAJOGAI**

Post Box No-23

Ring Road, Ambajogai, Dist. Beed, (MS) Pin -431517

E-mail:-manavlok1999@gmail.com

Website:- www.manavlok.org

**Manavlok Research Bulletin is published quarterly in the Month of March, June, September & December every year**
**by**
**Manavlok's College of Social Sciences, Ambajogai, Dist Beed.**

**Chairman**
**Dr. Prakash Jadhav**
**Principal**,
Manavlok College of Social Sciences

**Editorial Board**
**Dr. Nazir Sheikh**
Editor
Manavlok's College of Social Sciences
**Dr. Arundhati Patil**
Manavlok's College of Social Sciences
**Dr. Rama Pande**
Manavlok's College of Social Sciences
**Asst. Prof. Sukeshini Jogdand**
Manavlok's College of Social Sciences

**Advisory Board**
**Dr. E. N. Ashokkumar,**
Director, School of Social Sciences, Solapur Univeristy, Solapur
**Dr. Smita Awachar,**
HOD, Department of Sociology, Dr. B.A.M.University, Aurangabad
**Dr. Pushpesh Kumar,**
School of Social Sciences, Central University, Hyderabad
**Prof. Vilas Bet**
Dept. of Social Work, Walchand College, Solapur (Rtd. Prof.)
**Dr. Prakash Kathare**
School of Social Sciences, S.R.T.M. University, Nanded
**Dr. Pandit Chavan**
Vasantrao Naik Mahavidyalya, Nanded.
**Dr. Nilesh Deshmukh**
Principal, Ramrao Sarnaik College of Social Work, Washim.
**Dr. Ashok Chavan**
Assst. Prof. Late Rameshrao Varpudkar College, Sonpeth, dist. Parbhani

**Date of Publication :-25 September- 2016**

**Payment by Demand Draft/M.O in favour of :**
**'Principal Manavlok's College of Social Sciences, Ambajogai.'**
***Price : Rs. 100/-***

**Typeset By:-** Niranjan Jogi, Bibhishan Ghadge, Ramdas Kale
Manavlok's College of Social Sciences, Ambajogai

# MANAVLOK RESEARCH BULLETEIN

## *Themes for forthcoming issues*

---

## CHILDREN ISSUES & CHALLANGES

### October - December 2016

---

Research articles/papers up to 3000-4000 words are invited on the above mentioned themes. The authors are requested to send the articles/papers/review of books etc in the form of hard and softcopy or email. The article should reach before the last date of submission at the below address.

**Principal,**
Manavlok College of Social Work,
Ring Road, Ambajogai Dist Beed.
Maharashtra-431517
Email:- manavlok1999@gmail.com

Manavlok's college invites research papers and reviews for Manavlok Research Bulletin. The research paper must be original and unpublished. The Editor is not responsible for the papers that have appeared elsewhere.

The views expressed in the articles published in the Journal are those of the Authors and the Manavlok's College of Social sciences, Ambajogai- Manavlok's Research Bulletin does not hold itself responsible for them.

# CALL FOR PAPERS

**Manavlok Research Bulletin (a Quarterly journal) ISSN: 2349-3984**

Manavlok Coolege of social sciences (college of social work) has started multilingual (English, Hindi & Marathi) quarterly journal with ISSN No. which publishes in March, June, September and December every year. It is aimed to promote the quality research articles/paper. This journal provides a platform for the researcher, academicians, social work professionals and students from the discipline of social sciences.

**Call for Papers: -** Quality research papers/articles are invited in English, Hindi & Marathi language.

**Guidelines for Autours :-**

- ABSTRACT (TNR 11 Bold)
- KEYWORDS (TNR 11Bold)
- INTRODUCTION (TNR 11 BOLD)
- HEADING S (TNR 11 BOLD)
- FIGURES AND TABLES (TNR 11 BOLD)
- CONCLUSIONS (TNR 11 BOLD)
- ACKNOWLEDGEMENTS (TNR 11 BOLD)
- REFERENCES (TNR 11 BOLD)

**Format for research article:-**

1. Abstract
2. Key words
3. Introduction
4. Problems/objectives
5. Methodology (coverage, sampling, tools of data collection and data analysis, use of statistics etc)
6. Conclusions
7. References :- References should be embedded in the text in a consistent style, for instatnce, Patil, A.S. 2013. "Social Work Research: An Overview", Aai Publications, Ambajogai.

**Research paper/Article to be sent Email :-**manavlok1999@gmail.com, **Hard & Soft** copy at College Address

**Subscription Amount :**

1) Annual Individual Membership - Rs. 1000/- + Rs. 160/- (reg. postal charges)
2) Annual Institutions Membership - Rs. 1200/- + Rs. 160/- (reg. postal charges)

(Payment by DemanDraft/M.O in favour of - Principal, Manvlok College of Social Sciences. ambajogai)

3) **Bank Details. :-** Bank of Maharashtra, Branch Ambajogai
A/C/ No. – 60178141511
IFSC Code- MAHB0000037

**Note :** New Subscription fees will be effective from 1st July 2015 to onwards.

**Contact :**

- Dr. Prakash Jadhav, Principal, Manavlok's College of Social Sciences, Ring Road, Ambajogai, 431517 Dist Beed (Maharashtra) Cell No. 7770015050
- Dr.Arundhati Patil - 9422744166, Dr.Rama Pande-9405343510, Lect. Sukeshini Jogdand-9405826977.
- Dr. Sheikh Nazir, Editor, Manavlok Research Bulletin, Manavlok College of Social Sciences, Ring Road, Ambajogai, 431517 Dist. Beed (Maharashtra) Cell No. 7588162786, 7770015057

# CONTENTS


| | | |
|---|---|---|
| **1.** | **BARRIERS IN RURAL GIRLS EDUCATION OF BEED DISTRICT**<br>*-Pratima Kamlakar Kamble* | **2** |
| **2.** | पारधी जमातीतिल सामाजिक समस्या : एक व्यष्टि अध्ययन संदर्भ अंबाजोगाई जि. बीड.<br>*–डॉ. प्रकाश जाधव* | **6** |
| **3.** | `नाशिक जिल्हयातील ॲट्रोसिटी कायद्या अंतर्गत सन २०११ ते २०१३ या कालावधीत नोंदवलेले गुन्हे व सामाजिक स्थित्यंतर एक अभ्यास` संशोधनाचे परिक्षेत्र - नाशिक जिल्हा<br>*- डॉ. अरुधंती पाटील*<br>*- चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे* | **11** |
| **4.** | कलाकृती सौंदर्यातील भव्यता एक निरिक्षण<br>*–प्रा. क्षिरसागर प्रशांत बब्रुवान* | **18** |
| **5.** | मुस्लीम समाजः आर्थिक दुर्बलता आणि शिक्षण<br>*– शेख अमर अनिस* | **22** |
| **6.** | कौटुंबिक हिंसा : शारीरीक व माणसिक छळ एक व्यष्टी अध्ययण<br>–डॉ. प्रकाश जाधव<br>–प्रियंका नारायणकर | **27** |
| **7.** | **EFFECT OF KAPALBHATI PRANAYAM ON WEIGHT OF HIGH SCHOOLGIRLS**<br>*-Dr. Rajendra Lolage*<br>*-Dr. Narayan Jadhav* | **32** |

# BARRIERS IN RURAL GIRLS EDUCATION OF BEED DISTRICT

Pratima Kamlakar Kamble
Research Student of
S.R.T.M.University, Nanded
Email: pratima.17.kamble@gmail.com

**Introduction:**

India dreams becoming a superpower by 2020, but quite ironical is the fact that the country, whose population has crossed one billion marks, has literacy rates quite comparable with the underdeveloped countries. According to 2011 census the literacy rates for male and female stands at 82.14 percent and 65.46 percent. Various programs initiated by the state like Total Literacy Campaign, the district primary education program and National Program of nutritional support to primary education have done little to attain the goal.

The girl's child is one of the poorest and marginalized categories of Indian society, who finds hard exercise her rights. There is lack of understanding and a negative attitude towards girl child education at all levels of society. In India, very few have access to primary education. The first and foremost of course, is the way the parents perceive the female education. Since the very beginning the role of female confined to domestic work and looking after children. The tradition of setting at husband place after marriage, does not offer enough incentive to parent for spending on girls education. A boy's education is far more important as it enhances the chances of his being employed. In most villages, girl's education, rather than being seen as an incentive is seen as a liability. It is difficult to find a groom for an educated girl.

These are not only the reason responsible for the low level of female education. Though one cannot deny that gender inequality is, by and large, responsible for the situation but several other factor also work in this direction. Very often, the parents who are willing to educate their daughter are discouraged by the absence of school within the surrounding area and it is not considered safe to send girls to another village to study.

The recent figures show that the scheduled cast female literacy rate is dismal 19 percent (according to 2001 census).Government is committed to address the existing backwardness in education of minorities, specially the Muslims, constituting the major chunk of the minorities. As per the census report 2001, the population percentages of Muslim was more 12.4 percent than other minorities and it percentage of literacy 59.1percent is less than the other minorities. In spite of numerous schemes being launched by the government, the downtrodden classes still face social stigma and there is a lot to be done for the upliftment of these classes.

## Review of Literature:

Privatization, labour market discrimination, gender affiliation, patriarchy, culture, poverty etc. are the major contributing factor in influcing the rural girls education enrollment.The ideology behind opening school has family accessibility of education. Education expenditure and the provision of educational facilities have increased considerably, granting greater access to education for larger portion of the population. Safely concern and domestic responsibility particularly affect girls schooling. In villages, the concept of highly preserved, the determinant of the status of the family is

depended on the chastity of the female. In rural area in different community has identification of caste and families as superior or inferior, any incidents relating to the chastity may damage the status of the family in the village and it lead to generate the marital problems to their daughters.

Caldwell et.al. (1985) Development changes the structure of the economy and the type of jobs that are available, requiring a more skilled workplace. Additionally, these forces change the return to education in terms of attaining better jobs and higher earning. Developmental process has also changed the rural economy, increasing parental demand for schooling.

RupanBasumatary (2012) published an article entitled “School Dropout Across Indian status: An Economic Study”.in ‘International Research Journal of Social Sciences’ According to him, School dropout depends upon various factor such as poverty level, distance of school from home, transport facilities, quality of teacher, social environment and many other factors.

Sandhya Rani (2010) writeson “Women education in India: An Analysis’’. In ‘Asia Pacific Journal of social sciences’ She states that, Education is the reasonably good indication of development and right of every individual to education is one of the first provision of the universal Declaration on Human Rights. But reduction is often neglected in societies struggled to meet this need of their people. Recently, education has received greater priority as planners and policy makers finally recognized it as a key factor in determining the pace of development.

Women in India constitute 50 percent of the county’s human resources and their contribute are vital for the natures progress. But the magnitude of illiteracy among women is very high. Only 54.16 percent of women are literates as per 2001 Census.

Bhatkal Tanvi (2012) According to her, the gender biases are seen not only about the medium of education but in expenditure also. The preference given to the medium as expected expenditure. Mostly parents are not ready to give the expensive education to their daughter because they thought that ,one day she will get married, On the contrary, parent are ready to bear the expenditure on their son’s education. Even the few parents found that already they have made provision for expenditure on their son’s education.

Patrilocality is one of the considerations for expenditures on girl’s education. If the girls get an opportunity of employment, then it is not beneficial to her parents, then why they should extend the money for getting the job and spend money an education, dowry, marriage etc.

The ASER of 2005: referred to about 25 per cent of teachers were absent in the sampled schools covered by its surveyin rural area.

Krishna Kumar (2006) has recently observed: ‘there is no obvious reason why every child cannot be put into a school for eight years as the Constitution desires. We have the resources; we have the expertise to plan. The draft bill that would have led to legislation to facilitate theof the Constitutional amendment wasdiscussed bythe CABE last year.
The MHRD has calculatedthe cost and for a while it seemed as if the draft would movetowards presentation in Parliament. That, it now appears, will not happen, and the

reason one gathers is that the required financial expenditure is deemed to be unaffordable.

## Objectives:

1. To study obstacles in continuous of girl's education
2. To find out the parent approach towards girl's education in rural area

## Research Methodology:

This study depends on the secondary source of data collection. I collect this data from books, journals, research reports, and Internet explorer.

## Status of Beed District about Rural Girl's Education:

Beed was identified as one of 'core' backward district in India, by the chkravarti committee in 1982. This committee had identified 160 'core' backward districts in country. A study group appointed by the state planning board of the government of Maharashtra in 1991, to identify backward district in Maharashtra, had identified 17 backward districts in the state; Beed was one of these districts. Again recently in1997, the government of India had appointed a committee under the chairmanship of capital E.A.S.Sarma, to identify, '100 poorest districts' in the country. Beed was identified one of these poorest districts. This amply proves extreme backwardness of Beed district.

The proportion of rural population of Beed district to total population is 82 percent, while the urban population is just 18 percent according to the census report of 2012. Hence, 82 percent of the rural population is dependent on primary sector, which produce about 55 percent of district income.

The HDI value expresses the quality of life of the common people in a region. The HDI is an average value of three major variables, viz 1) Per capita income 2) Education 3) Health. The government of Maharashtra has published data relating to the HDI values of all 35 districts in the state. According to this report, Beed district has HDI value of only 0.47 and its ranks 18th amount 35 districts. The average HDI value for the state is 0.58. Gadchiroli occupies bottom position with the HDI value of 0.29, while Mumbai tops the list with the HDI value of 1.0.

Human poverty index also indicates the quality of life of the common people in a given region it includes variables like percentage of population served with safe drinking water and percentage of malnourished children. The value of HPI for Beed district was estimated at 21.21 percent and rank 24th among 30 districts in the state. The state HPI value was 16.22 percent (on 0-100 scale). The amply proves very low quality of Human development in Beed district. This needs to be improved urgently. As per 2011 census, 80.10 percent population of Beed district lives in rural areas of villages. The total Beed district population living in rural areas is 20,070,751 of which males and females are 1,082,978 and 987,773 respectively. In rural areas of Beed district, sex ratio is 912 females per 1000 males. If child sex ratio data of Beed district is considered, figure is 796 girls per 1000 boys. Child population in age 0-6 is 283,628 in rural areas of which males were 157,895 and females were 125,733. Literacy Rate in rural area of

Beed district is 74.73 percent as per census data 2011. Gender wise, male and female literacy stood at 84.08 and 64.70 percent respectively.

Various schemes, facilities, amenities is available to the rural girls for their continuous education. Although it is claimed each year that free textbooks for girls students are provided yet various reports suggest that in most places the timely supply of an adequate number of books is not achieved. Same is the case with uniforms. SSA has funds for scholarship but they are not generously given.

The growth of women's education in rural areas is very slow. This obviously means that still large womenfolk of our country are illiterate, the weak, backward, and exploited. Education is a most powerful tool of change of women position in the society. EFA programme was launched in 2002 by the government of India after its 86th Constitutional Amendment made education from age 6-14 the fundamental right of every Indian Child. But the position of girls' education is not improving according to determined parameter for women. Under this background we shall discuss the socio, economic and cultural barriers effect on rural girls' education.

## Conclusion:

In rural girl's education, it is low in comparison to urban in India. The socio-economic condition, assumption about education, lack of education facility, gender biases, lack of transportation, parents are not ready to send their girls in school because of increasing insecurity in surroundings are the main barriers in rural girl's education.

## Reference:

1. Desai, Sonalde, Sony Rastogi and Reev D. Vanneman. 2005. "Gender Differences in Child Survival in India: What do we know?"

2. Govinda, R. 2002. "Providing Education for all in India: An Overview ," In Indian Education report. Edited by R. Govinda. Oxford: Oxford University Press.

3. Government of India (2006). The Social, Economical, and Educational Status of the India: a Report.

4. Government of India (2011). Census of India 2011. General Population Table, Office of the Registar General, Min. of Home Affairs, Govt. of India.

5. Kumar, K. (2006). Ensuring Elementary Education for All, article in The Hindu newspaper, Thursday, 27 July 2006

6. Nayer, Usha. 2002. Education of Girls in India:An Assessment. In Indian Education Report. Edited by R. Govinda Oxford: Oxford University Press.

7. Sunil Kumar Sain and Sudhir Sudam Kaware "A Present Status of Women Education in India"

8. www.iitk.ac.in/..../12-rural %20 education

9. *http://www.education.nic.in/htmlweb/edusta.htm.* . Department of Education, MHRD

10. www.mainstreemweekly.net

# पारधी जमातीतिल सामाजिक समस्या : एक व्यष्टि अध्ययन संदर्भ अंबाजोगाई जि. बीड.

–डॉ. प्रकाश जाधव
प्राचार्य
मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय,
अंबाजोगाई

## गोषवारा :–

भारताला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्ष झाली. स्वतंत्र भारताला संविधान मिळाले. संविधानाच्या कलम १४ नूसार समानतेची तरतुद केली, २१ नूसार शिक्षणहक्क १४ वर्षाच्या मुलांना देण्यात आला. २००९ ला माफत व सक्तीचा कायदा केला. परंतू आजही भटक्या जमातीसाठी विशेष अशी तरतूद केलीली नाही. ज्या प्रमाणे अनुसुचित जाती व तनुसुचित जमाती साठी केंद्रशासनाने अर्थिक नियोजन केले जाते तसे आर्थिक नियोजन या जमातीसाठी नाही. म्हणून पारधी समाज आजही इतर समाजाप्रमाने मुख्य प्रवाहात आलेला दिसून येत नाही. सद्यस्थितील समाजानेच त्याचे सामाजिक समावेशन केलेला नाही म्हणून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या दिसून येतात.

## गुन्हेगारी :–

अतिप्राचिन काळापासून मानव आपल्या गरजा भागविण्यासाठी संघर्ष करीत आला आहे. परिस्थिती नूसार आपल्या गरजा भागविल्या जाव्यात म्हणून संस्कृति, लोकरूढी, मूल्य, संकेत इत्यादी मानवाने निर्माण केले. त्या चौकटीमध्ये राहून मानवाने आपल्या गरजा भागविल्या परंतू वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या त्या समस्या एवढया क्लिष्ट व गुंतागुंतीच्या झाल्या की त्या समस्येतून बाहेर पडणे अधिक आवघड झाले. जो समाज एका ठीकाणी स्थाईक झाला तो त्याने परिस्थितीवर मात करून परिवर्तन करून घेतले त्या समाजाच्या समस्या कमी झाल्या परंतू ज्या समाजाने परिस्थिती नूसार बदल घडवून आणला नाही त्या समाजाच्या समस्या आजही सुटलेल्या नाही. त्यात भटक्या जमातीचा समावेश आहे. प्राचीण काळात ग्रामीण अर्थव्यसस्था स्वायत व स्वतंत्र होती. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने शेतीला पूरक आसणारे साहित्य मनोरंजन, करमणूक, देवळे बांधणे, दगड फोडणे इत्यादी कार्य भटक्या जमातीचे लोक करावयाचे परंतू ब्रिटिश आगमनाने पूर्वीपार चालत आलेला व्यवसाय बंद पडले आणि भटका समाज उघडा पडला. त्यामुळे पोट भरणे अवघड झाले. म्हणून नाईलास्तव चोऱ्या करणे, दरोडा घालणे मनोरंजन इत्यादी असे कृत करत होते. स्वत:चे पोट भरण्यासाठी केलेल्या गुन्हयाला 'गुन्हेगारी जमाती' असे ब्रिटिशाने ठरविले ही फार गोष्ट लज्यास्पद आहे. समाज विरोधी कार्य केल्यास तो गुन्हा होतो. व त्यास गुन्हेगार म्हणतात. ब्रिटिशानी तर भारताची संपत्ती लूटून नेली ते गुन्हेगार नाहीत का हा संशोधणाचा विषय आहे. किंवा राजे महाराजे जनतेकडून कर वसूल करायचे ते गुन्हेगार नाहीत का, परंतू ब्रिटिश शासणाने पूर्ण भारत काबीज केल्यानंतर त्यांच्या कार्यात कुठेही अडथळा निर्माण होऊ नये, त्यांच्या वाहतूकीला किंवा

दळणवळणाला अडथळा निर्माण होवू नये म्हणून १८७१ ला भरतातील १९८ जमातीना गुन्हेगारी जमाती म्हणून घोषित केले. सर्व प्रथम गुन्हेगारी जमात म्हणून उत्तर भारतात लागू केली. १९११ मध्ये या कायदयामध्ये विस्तार करूण मध्यप्रदेशात गुन्हेगारी कायदा केला. १८३५ मध्ये ब्रिटिशानी colonia list स्थापन करून, गुन्हेगारी व दरोडेखोर नियंत्रण विभाग स्थानण केले. त्याचे पहिले अधिक्षक विल्यम स्लेमन यांनी आपले विचार गुन्हेगारी व दरोडेखोर याच्यांवर मांडला. तेव्हां ब्रिटिशानी १८५० पर्यंत गुन्हेगाराचे निर्मूलन केले. परंतू ज्यूरीस्ट जेम्स स्टेफन यानी वंशीक सिध्दांतानूसार जात, व्यवयसाय या व्यावसायीकावरून हे गुन्हेगारी वंशाचे आहेत म्हणून अशा संबध जोडला व त्याच जमातीना गुन्हेगारी वंशाचे असे संबोधू लागले आणि गुन्हेगारी जमाती कायदा संमत झाला तोच कायदा पिढयान पिढया चालू राहिला. जरी प्रामाणिक पणे पोट भरत असले तरी त्यांना गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जावू लागली. म्हणून हा समाज बराच काळ उपेक्षित मागासलेला आणि असंघटीत राहिला. गुन्हेगार जमातीच्या मुलांना त्याच्या आई वडिला पासून दूर ठेवावे, त्यांच्यावर चांगले संस्कार करावेत, म्हणून १८९० मध्ये कायदयात दुरूस्ती करण्यात आली व १९१९ मध्ये ऑल इंडिया जेल कमेटीने गुन्हेगार जमातीचे पूर्नवसन व्हावे अशी शिफारस केली. तसेच १९२४ मध्ये सेटंलमेंट सेंटर संपूर्ण भारतात सूरू करावे अशी सूचना मांडली. त्यात मुलांना शिक्षणाची सोय, औद्योगिक वसाहतीच्या निर्मितीतून रोजगार, कसण्यासाठी जमिन तसेच अकुशल कामगार म्हणून या जमातीमधील लोकांची सोय इत्यादी तरतूदी केल्या तरंतू हया तरतूदी प्रशासकीय दप्तरामध्येच राहिल्या.

जरी स्वातंज्य प्राप्तीनंतर १९५२ मध्ये सोलापूर येथे पंडित नेहरूनी गुन्हेगारी जमातीच्या लोकांना विमूक्त केले म्हणून विमूक्तजाती असे संबोधले जाते.

अनेक भटक्या जमाती पैकी पारधी ही एक प्राचीन काळापासून भटकणारी जमात म्हणून ओळख आहे. आपल्या संसाराच बिराड पाठीवर घेवून आज या गावी तर उदया दुसऱ्या गावी उदनिर्वाहासाठी भटकत आसतो. इतर अनेक भटक्या जमातीना पारंपारीक व्यवसाय आहे. परंतू पारधी जमातीना पारंपारीक व्यवसाय नाही. पारधी जमातीना विविध नावाने ओळखले जाते. जंगलात राहणारा तो जंगल पारधी, गावाजवळ पाल टाकून राहणारा गावपारधी, फासा टाकूण पक्षी पकडणारा फासे पारधी आणि गायी पाळूण राहणारा गायी पारधी हरणाची शिकार करणारा हरणपारधी, अशा त्यांच्या पोटजाती आहेत. वरील जमातीत रोटी – बेटी व्यवहार होत नाही. तसेच प्रथा, देवी, देवता देखिल वेगळे आहेत. ही जमात विशेषता विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रात आढळते. सर्वात वरीष्ठ जमात म्हणून 'राज पारधी' यांना मानले जाते. म्हणजेच या पारधीत देखिल वरिष्ठ – कनिष्ठ मानले जाते. पारधी समाजाची पाच कुळे मानली जाते. त्यात पवार, चव्हाण, काळे, भोसले, शिंदे याचा सामावेश होतो या कुळीनाच आडनाव देण्यात आलेले आहे. प्रत्येक कुळाचे दैवत वेगळी आहेत. पवाराची लक्ष्मी, चव्हाण यांचा खंडोबा, काळे यांचे काळूबाई, भोसले याचे भवानीमाता तर शिंदे याचे लक्ष्मी ही कुलदेवत आहे. पारधी जमातीत न्याय निवाडयासाठी स्वतंत्र जात पंचायत असते. सेशन कोर्ट बारामती येथे असून त्याचा न्यायाधिश किंवा पाटिल हा गिरणवाला लाला भोसले असल्याचे सांगतात. तर हायकोर्ट पूणे येथे आहे. तेथे न्यायाधिश म्हणून तलाठया काळे हा काम

पाहतो. तर अहमदनगर येथे सुप्रीम कोर्ट झपकार शिंदे हा न्यायाधिश म्हणून काम पहातो. न्यायालयाने किंवा पंचाने जो निर्णय दिला असेल तो मान्य करावे लागते. पंचायतीचा निर्णय मान्य नाही केल्यास जातीने बहिष्कार घालण्याची पध्दत आहे.

**व्यष्टी अध्ययण :–**

बापू शंकर पवार मुळगाव मांग वडगाव ता केज जि. बीड. येथील रहिवासी असून त्यांचे शिक्षण ४ थी पर्यंत झाले व त्यांचे वय वर्ष ७२ आहे. भटकंती असल्यामुळे शिक्षण सोडले. त्यांना अशोक, विलास, शिवाजी, संजय, विजय व धनंजय अशी ६ मुले आहेत. यांचे शिक्षण अशोक आणि शिवाजी यानी शिक्षण घेतले नाही. परंतू विलास १२ वी, संजय ७ वी, विजय, धनंजय १० वी पर्यंत शिक्षण घेतले आहे. बापू पवार यांनी १९६९ मध्ये सलमाबी दस्तगीर पठाण यांचे कडून १० एकर ६ गुंटे जमीन खरेदी केली. उर्वरित जमीन १० एकर १९८५ ला सर्व्हे नं १७१ ला खरेदी केली. परंतू गावातील लिंबाळकर या सवर्ण जातीतील लोकांनी बापू पवार व त्यांच्या मुलांना काठयाने मारहान केली. मारहाणीचे कारण विचारले आसता तुम्ही पारधी आहोत. गुन्हेगार आहेत. तुम्ही गावात राहावयाचे नाही. परिणामता बापाचे व मुलांचे पाय तोडून टाकले त्यांच्या पायात स्टीलचे रॉड टाकलेली आहे. परत आपण गावात गेल्यास मारहान करतील या भितीने अंबाजोगाईत २००६ पासून स्थाईक झाले. रस्त्याच्या बाजूला पाल टाकण्यासाठी साफसफाई करताना पाहून अंबाजोगाईचे पोलिस पारधी यांना यशवंतराव चव्हाण चौकात मोकळया जागेत पाल टाकण्यासाठी तोंडी परवानगी दिली म्हणून म्हणून ते २००६ पासून अंबाजोगाईत वास्तव्यास आहेत. सध्या सर्वभाऊ विभक्त राहतात.

**शैक्षणिक स्थिती :–**

बापू पवार याचे शिक्षण ४ थी पर्यंत झाले पूढील शिक्षण भटकत जिवण असल्याने व त्यांच्या मुलांचेही शिक्षण पूर्ण झाले नाही. दारिद्रय, गरिबी असल्याने शिक्षण घेतले नाही. शैक्षणिक खर्च परवडत नाही जरी शिक्षण घेतले तरी नोकरी मिळत नाही. नोकरी साठी देणगी भरमसाठ लागते. म्हणून आम्ही मुलांना शिक्षण देत नाही. मुलींच्या शिक्षणा बद्दल प्रश्न विचारले आसता जमाण्याचा भरोसा नाही. वेढे वाकडे झाल्यास फिर्याद कोठे मागावी यासाठी मुलींना शिक्षणासाठी पाठवले नाही. परंतु अंबाजोगाईत स्थाईक झाल्याने मुले – मुली प्राथमिक शाळेत जाताना दिसून आली. जातीचे दाखले मिळत नाहीत. त्यामुळे आडचणी येतात. आमच्या कुटुंबातील एखादयाला सेवकांची जरी नौकरी दिल्यास ते तरी मुलांना शाळेत घेऊन जातील. अशा अपेक्षा व्यक्त केल्या. शैक्षणिक वातावरण नसल्याने मुले इतर समाजाप्रमाणे शिक्षण व्यवस्थीत घेत नाहीत. शाळेत अनुउपस्थितीचे प्रमाण अधिकतेने दिसून आली. घरी गृहपाठ करण्यासठी स्वतंत्र जागा नाही, विद्युतची सोयी नाही त्यामूळे रात्री अभ्यास करताना अनेक अडचणी दिसून आली.

**सांस्कृतिक स्थिती:–**

आजही पारधी समाजात रूढी, परंपरा पाळत आसल्याचे दिसून आले. याचे कुळदैवत आरबाई देवी माळ उमरी जि. सोलापूर येथे आहे. या देवीला लग्न विधी किंवा इतर कार्यक्रम करावयाचे असल्यास बकरा, हालगट किंवा गोडपदार्थ दिले जाते. तसेच तुळजापूर देवीवर देखील

श्रध्दा दिसून आली आहे. दिवाळी, दसरा, पंचमी सण साजरी करतात. लग्न विधीत आगोदर त्यांच्या परंपरेनुसार लग्न लावतात. व नंतर अधुनिक पध्दतीने लग्न लावतात. प्राचीन काळात त्यांच्याच समाजातील व्यक्तीने लग्न लावण्याची पध्दत होती. पिंपळाच्या पाणाचे भासिंग म्हणून लावतात. पिंपळाचे पाण म्हणजे वर कोरा असे समजल्या जाते. हळद वगैरे कार्यक्रम करताणा त्यांच्या बोली भाषेनूसार गाणी म्हणतात. सध्य स्थितीत काही बाबी पारंपारीक पध्दतीने करताना तर काही नवीन संस्कृती नूसार सण उत्सव साजरा करतात.

## सामाजिक स्थिती :—

पारधी समाजात जात पंचायतीना महत्व दिले जाते. जात पंचायत हि त्यांच्या कुळानुसार असते जसे काळे, चव्हाण, शिंदे, धारपवार, कोरडे पवार, यातील प्रत्येक मुळातील एक व्यक्ती पंचात सामावेश होतो. या पंचायतीत महिलांना देखिल स्थान होते. न्याय निवाडा करताना सर्व पंच मिळून त्या निर्णयाला नकार दयावयाचा किंवा होकार दयावयाचा हे सर्व मिळून निर्णय घेत असत. आडनाव बदललेकी जातीत घ्यावयाचे नाही. लबाड बोलले की दंड करावयाचा, दंड नाही भरल्यास जेवढा दंड असेल तेवढा चिंचेचा किंवा बेसरमाच्या ओल्या फोकानी सर्व पंचानी मिळून मारायचे. दुसऱ्या बाइचे लुगडे जर पुरूषाने उषीखाली घेतले तरी दंड घेतला जातो. दुसरी बाई एखादया वेळेस आपल्या मुलावरून आलांडून गेल्यास काळानूसार किंवा पध्दती ही त्या महिलेला ६ रूपये दंड घ्यावयाचे व हया दंडाचा उद, कापूर, घेवून देवाचा कार्यक्रम साजरा करावयाचा. दहा वर्ष झाली अंबाजोगाईत या वर्षी मतदान यादीत पहिल्यांदाच नोंद झालेली आहे. एखादया व्यक्ती मृत्यू पावल्यास त्यांना त्याच्या मुळगावी घेवूनच अंतविधी करावी लागते. रोजगारासाठी पारधी समाजाची व्यक्ती कामासाठी गेल्यास त्यांना कामे दिली जात नाही. एखादया व्यक्तीच्या घरात हा पारधी समाज गुन्हेगारी समाज आहे, चोरी करणारा आहे अशी सर्वसाधारन धारणा आजही दिसून येतात. किंवा त्यांना कामावर ठेवत नाही. इतर समाजातिल व्यक्ती सोबत संबध नाही. इतर समाजाकडून सन्मान दिला जात नाही. सध्या सर्व पारधी हे पाल टाकून १० X १५ च्या जागेत राहतात. घरात जेमतेम स्वयंपाकाची भांडी दीसून आली. ऊन, पाऊस व हिवाळा या दिवसात त्यांना खूपच त्रास सहन करावा लागतो. उघडया जमिनीवर असल्याने त्यांना पिण्याचे पाणी, बाथरूम महिलासाठी आंघोळीची जागा, लाईट इत्यादी सोय नाही. लहान मुले, स्त्रीया व पुरूष यांचे कपडे अस्वच्छ दिसून आली. त्यामुळे रोगराईचे समस्याना सामोरे जावे लागते आहे. आई वडील असुशिक्षीत असल्याने लहान मुलांवर अयोग्य संस्कारात जीवन जगतात.

## आर्थिक स्थिती :—

बापू पवार यांचे मुले सध्या अंबाजोगाई व इतर परिसरात मिळेल त्या ठिकाणी कामे करतात. उदा. शेतीचे कामे, रस्ता, घरे बांधकाम, बंधारा इत्यादी ठिकाणी कामे करताना दिसून आली. सध्यस्थितीत महिलांना १५० रूपये व पुरूषांना २५० रूपये मजूरी दिली जाते. मजूरीच्या बाबतीत

आजही भेदभाव केला जातो. जेमतेम मजूरी मिळत असल्याने कुटुंबाचे उदनिर्वाह करणे आवघड होत आहे. शासनाकडून कोणत्याच प्रकारे मदत नाही. राशन धान्य सुध्दा मिळत नाही. आमची आर्थिक स्थिती सुधारावयाची असल्यास आम्हाला शासनाने घरकुल योजना दयावी त्यामूळे आम्हाला जिवण जगण्यासाठी हातभार लागेल. व आमच्या मजूरीतून काही रूक्कम शिल्लक राहिल व मुलांना चांगले शिक्षण देवू. एका ठिकाणी स्थायीक व्हावे वाटते परंतू सध्य स्थितीत अनेक अडचणी समोर येतात. शासनाने आमच्या कडे दुर्लक्ष केले आहे.

## निष्कर्ष :—

ब्रिटिशांनी त्यांच्या जातीवर लादलेला गुन्हेगारी कलंक आजही संपुष्टात आला नाही. जरी भारतीय संविधानात अनेक हक्क दिले असले तरी ही पारधी समाजाला विविध हक्का पासून वंचित राहावे लागते. जरी शिक्षणाचा हक्क कायदा २००९ ला पारीत केला असला तरी पारधी समाजाला त्याचा कोणताच फायदा झाला नाही. परिवर्तनासाठी शिक्षण एक प्रभावी माध्यम आहे हे त्यांच्या लक्षात आले त्यामुळे ही जमात नवीन प्रवाहात येवू पाहण्यासाठी प्रयत्नरत आहे. परंतू पारधी समाजात शिक्षण शिकुन नौकरी मिळत नाही. कारण भ्रष्टाचार मोठया प्रमाणात आहे. पैसा दिल्यास नौकरी मिळते अशी त्यांची धारणा आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वंयसेवी संस्था, शासन, सामाजिक कार्यकर्ते यांनी पूढाकार घेतलेला नाही. जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी अनेक अडचणी येतात. रेशन कार्ड सुविधा पासून वंचित राहावे लागते. सद्यस्थितीत ते दुर्बल आर्थिक परिस्थितीला सामोरे जाताना दिसून येतात. आजही ते रुढी, परंपरा, प्रथा पाळतांना दिसून येतात. पण काही अंशी त्यांच्यात परिस्थिती नूसार बदल झालेला आहे. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसून आले. तसेच महिलांमध्ये कौशल्य विभागाच्या प्रशिक्षणाचा अभावही दिसून आला. पण त्यासाठी त्यांना शासनाच्या अर्थ सहाय्याची गरज आहे. पालकांत शिक्षणाविषयी जागरुकता निर्माण करुन त्यांनी त्यांच्या मुलांना शिक्षणास प्रवृत्त केल्यास पारधी समाजात बदल घडून येवू शकेल.

## संदर्भ :—

१) गर्ग. स. मा. — भारतीय समाज विज्ञान कोष, खंड ३ शिवाजीनगर पूणे.

२) दाधो काचोळे — गुन्हा समाजशस्त्र, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

३) मोतीराम राठोड — भटक्या विमुक्तांचा जाहीरनामा, बंजारी कॉलनी औरंगाबाद.

४) रामनाथ चव्हाण — भटक्या विमुक्ताची जातपंचायत, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. सदशिव पेठ पूणे.

५) सुनिल मायी, शिल्पा कुलकर्णी — गुन्हा आणि समाज, डायमंड पब्लिकेशन पूणे.

# `नाशिक जिल्हयातील ॲट्रोसिटी कायद्या अंतर्गत सन २०११ ते २०१३ या कालावधीत नोंदवलेले गुन्हे व सामाजिक स्थित्यंतर एक अभ्यास` संशोधनाचे परिक्षेत्र - नाशिक जिल्हा

**मार्गदर्शक**
**डॉ. अरुधंती पाटील**
मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय
व संशोधन केंद्र, अंबाजोगाई जि.बीड

**संशोधक**
**चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
मानवलोक समाज विज्ञान
महाविद्यालय व संशोधन केंद्र
अंबाजोगाई

**१.१. प्रस्तावना :**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध उपाय योजना केल्या असल्या तरी या जाती व जमातीचे लोक सर्वच बाबतीत मागासलेले व दुर्बल राहिले आहेत ते अनेक मानवी अधिकारापासून वंचित आहेत तसेच ते अनेक अपराधाचे बळी ठरले असुन प्रतिष्ठा, अपमान व वागणुकीला त्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांना आपल्या जीवास, मालमत्तेला मुकावे लागण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत व आजही देशात कुठे ना कुठे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावर अत्याचाराच्या घटना घडतांना दिसून येत आहेत.

भारतीय समाज व्यवस्थेने येथील चार्तुवर्ण्य व्यवस्थेतील ज्या जाती होत्या त्यांना भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती संबोधले आहे या जातीवर हजारोवर्ष मानवी अत्याचार करण्यात आला. समाजातील सर्व बंधने लादून `मनुस्मृती` या ग्रंथाने गुलामापेक्षाही हीन दर्जा या जातींना दिला. तिच स्थिती अनुसूचित जमातीची असल्याचे जानवते. हा समुदाय भारतातील मुळ आदिम समुदाय असूनही या समाजाचा कुठल्याही स्वरुपाचा विकास होऊ शकला नाही या समाजाला व्यवस्थेने नेहमी अंधश्रध्दा, अशिक्षित, समाजव्यवस्थेच्या बाहेर म्हणजे जंगल, दऱ्या खोऱ्यात ठेवले त्यांना समाज विकासाचे फळे चाखता आली नाही. या समुदायावरही सवर्णानी विविध अत्याचार केले म्हणून या दोन्ही समुदायाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकिय, सांस्कृतिक अशा कुठल्याही स्वरुपाचा विकास होऊ शकला नाही. त्यंच्यावर अनेक बंधने लादली गेली. त्यामुळे हे समुदाय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून नेहमी दूर राहिले.

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या समुदायाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी विविध कायदे, धोरणे तयार करण्यात आली. परंतु स्वातंत्र्यानंतरही सर्वाणांची वैचारिक मानसिकता बदलली नाही. या समुदायांवर अत्याचार विविध कारणांनी स्वातंत्र्यानंरही होत राहिले त्यामुळे या समुदायामध्ये भिती, अधिकारांवर गदा येऊ लागली. त्यांच्या प्रगतीत अडथळे निर्माण होऊ लागले म्हणून या समुदायांवर होणारे अत्याचार, हिंसा कुठेतरी थांबल्या पाहिजे व अनुसूचित जाती व अनुसूचित जामतीच्या समुदायावर अत्याचार करण्याऱ्यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे आणि त्यांच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे. तसेच हे समुदाय समाजाच्या मुख्य प्रवाहात यावा म्हणून सन १९८९ मध्ये ॲट्रोसिटी कायदा तयार होऊन या कायद्याच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या समुदायावर होणारे अन्याय, अत्याचार रोखण्यासाठी त्यांना आळा घालण्यासाठी त्यांना संरक्षण देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला.

**१.२ समस्यासूत्रण :**

महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंख्येचा विचार केला असता सन २०११ प्रमाणे अनुसूचित जातीच्या समुदायाची लोकसंख्या १३२७५८९८ इतकी आहेत. अनुसूचित जातीचे प्रमाण ११.०८ टक्के आहेत. त्याच प्रमाणे अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०,५१०,२१३ त्याचे शे. प्रमाण ०९.३५ टक्के आहेत. तसेच अनुसूचित जातीची नाशिक जिल्हयातील लोकसंख्या २०११ नुसार ५,५६,६८७ आहेत. त्यांचे शे. प्रमाण ०९.०८ % आहेत. त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीची नाशिकची लोकसंख्या १,५६४,३६९ त्याचे शे. प्रमाण २५.६१ टक्के आहेत. मात्र आजही अनुसूचित जाती व जमातीवर होणारे अत्याचार कमी झालेले नाहीत. भारतीय राजयघटनेमध्ये कलम १७ अन्वये अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा असुन देशातील जातीयता नष्ट करण्याचा त्यामागील उद्देश आहे. त्यामुळे भारतातील सर्व लोक समान पातळीवर आले आहेत असे असतांनाही देशात सऱ्हासपणे जातीयता पाळली जाते. उच्च, नीच्च, भेदभाव केल्या जातो, त्याचा दुष्परिणाम देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेवर होतो. म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या समुदायावर होणारे अत्याचारांचे प्रमाण कमी व्हावे, हा कायदा तयार होऊन २६ वर्ष होऊनही उच्च जातीच्या समुदायाच्या विचारात, मानसिकतेत बदल झालेला नाही. या कायद्याद्वारे अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायाचा अर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जीवनात बदल झालेले आहे का? अनुसूचित जाती व जमातीवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांच्या प्रमाणात घट झाली आहे का ? तसेच अत्याचाराचे विविध प्रकार कोणती आहेत? असे सविस्तर अध्ययन संशोधकाने नाशिक जिल्हा या मध्ये नाशिक शहर व नाशिक ग्रामीण या परिक्षेत्राअंतर्गत ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत सन २०११ ते २०१३ या कालावधीत नोंदवलेले गुन्हे व या कायद्यामार्फत अनुसूचित जाती व जमाती समुदायाचे सामाजिक स्थित्यंतर झाले का ? आणि कशा स्वरुपात झाले यासंबंधी अध्ययन करण्यात आलेले आहेत.

**१.३ अभ्यासाचे महत्व :**

सदरचा अभ्यास नाशिक जिल्हयात केला असून यामध्ये नाशिक शहर व नाशिक ग्रामीण यात दोन विभाग केले आहे. या जिल्हयामध्ये अनुसूचित जाती ०.८ टक्के व जमातीचे २५.६१ टक्के प्रमाण आहेत.
या संशोधन अभ्यासाचा फायदा समाजकल्याण विभागाला होऊ शकतो. तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायावर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थानी होऊ शकतो. सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, विद्यार्थी, अभ्यासक यांनाही होऊ शकतो. अनुसूचित जाती व जमाती वरील अत्याचार कमी करण्यासाठी आणि शासनांला त्यासंबंधी धोरण करण्यासाठीही अध्ययनाचा उपयोग होऊ शकतो.

नाशिक जिल्हयात अनुसूचित व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत घडलेल्या गुन्हयांची तपशिल खालील प्रमाणे सांगता येईल.

नाशिक शहर व नाशिक ग्रामीण हे दोन विभाग मिळवून ९६९ गुन्हे दिनांक ०१.०४.१९९५ ते ३०.१२.२०१३ पर्यंत दाखल झालेले गुन्हांची संख्या इतकी आहेत. म्हणून ॲट्रोसिटी कायद्याची परिणामकारकता किती याचा विचार केला तर या कायद्यानुसार आता पर्यंत किती अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा झाली आहेत? अत्याचार करणाऱ्यांमध्ये सवर्णामधील कुठल्या जातीचे प्रमाण अधिक आहे. अशा सर्वांगिण सांख्यिकिय आकडेवारीनुसार अभ्यास करुन काद्ययाचे महत्व आणि गरज यांचा पळताळा घेण्यात आलेला आहे.

**१.४ संशोधनाचे उद्देश :**

१. अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायातील व्यक्तीला न्याय मिळवून देण्यासाठी ॲट्रोसिटी कायदा १९८९ मधील उपयोगीतीचे अध्ययन करणे.
२. ॲट्रोसिटी १९८९ अंतर्गत नाशिक जिल्हयात नोंदविलेले गुन्हांचे प्रकार व प्रमाण यांचे अध्ययन करणे.

३. ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत पिडित व्यक्तींचे सामाजिक स्थित्यंतर कशा स्वरुपात केले जाते. या संबंधीचा आढावा घेणे.

**१.५. संशोधनाची गृहीतके :**

१. ॲट्रोसिटी कायद्या १९८९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास अनुसुचित जाती व जमातीच्या समुदायातील व्यक्तींचे मानवी अधिकारांचे संरक्षण होऊ शकते.

२. ॲट्रोसिटीच्या कायद्याच्या माध्यमातून अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायातील पिडित व्यक्तींचे पुनर्वसन होत आहे.

३. ॲट्रोसिटी कायद्यान्वये समाजात जातीय सलोखा निर्माण होण्यास मदत होऊ शकते.

**१.६. तथ्य संकलनाचे साधने :**

तथ्य संकलनाचे साधने म्हणून संशोधकाने प्राथमिक तथ्य संकलन साधने व द्वितीयक तथ्य संकलन साधने याचा वापर केला आहे. यात असहभागीय निरिक्षण पध्दत, मुलाखत अनुसूची, नियत कालीके, संदर्भग्रंथ, शासकीय दस्तऐवज, संशोधन अहवाल, मासिके इत्यादी सामग्रीचा उपयोग केला आहे.

**१.७. पारिभाषिक शब्दांचे अर्थ :**

**१. अनुसूचित जाती :**सर्व साधारणपणे मागावर्गीय सामाजिक गट सुची करण्याचा हेतूने अनुसूचित जाती हा शब्द प्रयोग आढळतो. भारतीय संविधानाचा ३६६ ते खंड २४ची तरतुदीनुसार अनुच्छेद ३४१ नुसार अनुसूचित जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**२. अनुसूचित जमाती:**सर्व साधरणपणे अनुसूचित जमाती हा शब्द भारतीय राज्य घटनेतील अनुच्छेद ३६६ ते २५ ची तरतूद कलम ३४२ नुसार वनात, डोंगरात राहणाऱ्या आधुनिक जिवनशैलीशी अपरिचित असणाऱ्या जमाती या अनुसूचित जमाती म्हणून संबोधण्यात आलेले आहेत.

**३. अत्याचार :** अत्याचार या शब्दाचा अर्थ शिक्षा पात्र अपराध असा आहे. एखांदया व्यक्तीवर शस्त्रास्त्र हल्ला करणे, जाळपोळ करणे, हाणामारी करणे, धमकी देणे, किंवा व्यक्तीच्या अधिकारांवर गदा आणने म्हणजे अत्याचार किंवा हिंसाचार होय.

**४. अत्याचारित व्यक्ती :** ज्या व्यक्तीने पिडित व्यक्तीवर अन्याय केलेला आहे अशी व्यक्ती.

**५. पिडित व्यक्ती :** ज्या व्यक्तीवर अन्याय किंवा हिंसा झालेली आहे अशी व्यक्ती.

**६. गुन्हे :** खुन, बलात्कार, विनयभंग, जाळपोळ, गंभीर दुखापत, जमीन विषयक दावे, जातीवाचक शिवीगाळ इत्यादी. स्वरुपातील एखांदे कृत्य करणे जे मानवीय वर्तणूकिला मान्य नाही. अशा स्वरुपातील कायद्याने ठरवून दिलेली क्रिया.

**७. साक्षीदार :** संबंधीत न्यायालयीन प्रक्रियेमध्ये पुरावा म्हणून त्या खटल्याशी संबंधीत व्यक्तीने दिलेला जबाब किंवा प्रतिक्रिया.

**१.८. संशोधनाचे चल :**

**१. स्वतंत्र्य चल :**उपाय करणे, आर्थिक सहाय्य, सहकार्य करणे, शिक्षण, लिंग, न्याय मिळवून देणे.

**२. परावलंबी चल :** पुनर्वसन, अमलबजावणी, अधिकारांचे संरक्षण, कौटुंबीक गरजा, प्रतिबंध.

**१.९. संशोधनाचे क्षेत्र :**

संशोधनाचे क्षेत्र `नाशिक जिल्हा` असून यामध्ये नाशिक शहर व नाशिक ग्रामीण या दोन विभागाचा समावेश असणार आहे.

**१.१०. नमुना निवड पध्दत :**

संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील बहुपदी किंवा एकक पुंज नमुन्याची निवड करण्यात आली आहे. या नमुना पध्दतीमध्ये संशोधकाने समग्राचे अनेक समुहामध्ये विभाजन केले आहे यात १०० एककांच्या संख्येचा नमुना घेतलेला आहेत.

**१.११. संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनात संशोधन आराखडयाचे स्वरुप हे वर्णनात्मक आहे. यामध्ये अनुसूचित जाती व जमातील व्यक्ती, समुदाय, हिंसाचाराचे प्रकार, घटना, पिडित व्यक्तीच्या समस्या, कौटुंबीक स्थिती, सामाजिक स्थिती, आर्थीक स्थिती, यांचे सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहेत.

**१.१२ संशोधनाचे विश्व :**

नाशिक जिल्हयातील अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायावर ॲट्रोसिटी कायदा १९८९ अंतर्गत सन २०११ ते २०१३ या कालावधीत नोंदविलेली एकुण गुन्हे १८५ असून या मध्ये पिडित व्यक्ती, अत्याचारित व्यक्ती, तसेच संबंधीत खटल्यातील वकील हे संशोधनाचे विश्व आहे.

**१.१३. महाराष्ट्रातील विभागवार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांची आकडेवारी. (वर्ष २०१२-२०१३)**

**सारणी क्र ०१**

| अ.क्र | विभाग | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|
| ०१ | पश्चिम महाराष्ट्र | २२४ | ३३४ |
| ०२ | मराठवाडा | १६३ | २६२ |
| ०३ | विदर्भ | २६४ | ४०६ |
| ०४ | खानदेश | १४९ | २४३ |
| ०५ | मुंबई - कोकण | ७१ | १०८ |
| ०६ | रेल्वेतील गुन्हे | ०३ | ०१ |
| ०७ | इतर | २१५ | २८० |
| | **एकुण** | **१०८९** | **१६३४** |

**विश्लेषण :**

वरील सारणीवरुन असे निदर्शनात येते की, वर्ष २०१२ मध्ये सर्वाधिक गुन्हे हे विदर्भ या विभागात घडलेले असून त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात अत्याचारांच्या घटनांची नोंद झाल्याचे दिसून येते. तसेच २०१३ या वर्षामध्ये सर्वाधिक ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत नोंद झालेल्या घटना हया विदर्भ विभागात घडलेल्या असून त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र या विभागात नोंद झाल्याचे दिसून येते.

**नाशिक जिल्हयातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवर होणारे विविध अत्याचारांचे प्रकार व त्यांची संख्या (वर्ष २०११ ते २०१३)**

**सारणी क्र ०२**

| **अ.क्र** | **गुन्हांचा प्रकार** | **२०११** | **२०१२** | **२०१३** |
|---|---|---|---|---|
| ०१ | खुन | ०० | ०१ | ०७ |
| ०२ | बलात्कार | ०७ | ०५ | ११ |
| ०३ | विनयभंग | ०६ | ०४ | १२ |
| ०४ | जाती वाचक शिवीगाळ | १५ | २० | २८ |
| ०५ | दंगा | ०९ | ०९ | १६ |
| ०६ | दरोडा | ०१ | ०० | ०५ |
| ०७ | शेती विषयक वाद | ०१ | ०२ | ०२ |
| ०८ | गंभीर दुखापत | ०१ | ०० | ०४ |
| ०९ | इतर | ०२ | ०८ | ०८ |
| | **एकुण** | **४२** | **५०** | **९३** |

**विश्लेषण :**

वरील सारणीवरुन असे दिसून येते की २०११ मध्ये जातीवाचक शिवीगाळ हया गुन्हया खाली सर्वाधिक १५ गुन्हे नोंद झालेले आहेत. तर एकुण ४२ गुन्हे नोंद झाल्याचे दिसून येते तसेच २०१२ मध्ये जातीवाचक शिवीगाळ या गुन्हया खाली २० गुन्हे नोंद झालेले आहेत. तर एकुण गुन्हे ५० नोंद झाल्याचे दिसून यते. आणि २०१३ मध्ये एकुण गुन्हयांपैकी जातीवाचक शिवीगाळ या गुन्हया खाली २८ गुन्हे नोंद झालेले आहेत. तर एकुण गुन्हे ९३ नोंद झाल्याचे दिसून येते.

**नाशिक जिल्हयातील अनुसूचित जातीवर होणाऱ्या पिडीत व्यक्तींची जात व त्यांची वर्गीकरण**

**सारणी क्र ०३**

| **अ.क्र** | **पिडित व्यक्तीची जात** | **गुन्हयांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| ०१ | महार/नवबौध्द | ६३ | ५७.२७ % |
| ०२ | मातंग | ०८ | ०७.२७ % |
| ०३ | चांभार | ०८ | ०७.२७ % |
| ०४ | इतर | ०२ | ०१.८१ % |
| ०५ | जात माहित नाहीत | २९ | २६.३६ % |
| | **एकुण** | **११०** | **१०० %** |

**विश्लेषण :**

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सवर्णांच्या अत्याचाराला सर्वाधिक महार/नवबौध्द समाज बळी पडलेला आहे. त्यांची एकुण संख्या ६३ असुन त्यांचे शेकडा प्रमाण हे ५७.२७ टक्के इतके आहेत. तर जात माहित नाहीत (एफ आय आर नोंदवितांना पिडितांची जातीची नोंद करण्यात आलेली नाही) त्यांची संख्या २९ असुन त्यांचे शेकडा प्रमाण हे २६.३६ टक्के आहेत.

**नाशिक जिल्हयातील अनुसूचित जमातीवर होणाऱ्या पिडित व्यक्तीची जमात व त्यांचे वर्गीकरण.**

**सारणी क्र ४**

| अ.क्र | पिडित व्यक्तीची जमात | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१ | महादेव कोळी | १८ | २४ % |
| ०२ | भिल्ल | २६ | ३४.६६ % |
| ०३ | पारधी | ०१ | १.३३ % |
| ०४ | कोकणा | ०४ | ५.२२ % |
| ०५ | वारली | ०१ | १.३३ % |
| ०६ | इतर | ०२ | २.६६ % |
| ०७ | जमात माहित नाही | २३ | ३०.६६ % |
| | **एकुण** | **७५** | **१०० %** |

**विश्लेषण :** वरील सारणीवरुन असे दिसून येते की, सवर्णाच्या अत्याचाराच्या सर्वाधिक भिल्ल समाज बळी पडलेला आहेत. त्यांची वारंवारिता २६ असुन त्याचे शेकडा प्रमाण ३४.६६ % इतके आहे तर त्यानंतर महादेव कोळी हया समाजावर अत्याचार झाल्याचे दिसून येते त्यांची संख्या वारंवारिता १८ असून त्यांचे शेकडा प्रमाण हे २४ % आहेत. तर जमात एफ.आय.आर मध्ये नोंद नसल्याचे किंवा माहित नाही अशी संख्या २३ असून त्याचे शेकडा प्रमाण हे ३०.६६ % आहेत.

**१.१४. अनुसूचित जातीची देशातील सद्य:स्थिती :**

१. प्रत्येक १८ मिटाला अनुसूचित जातीवर अत्याचाराचा गुन्हा घडतो.
२. प्रत्येक दिवशी ०३ अनुसूचित जातीच्या महिलांवर बलात्कार होतो. त्यामधील ०२ अनुसूचित जातीच्या व्यक्तीचा खून होतो. ०२ अनुसूचित जातीच्या व्यक्तीची घरे जाळली जातात. ११ अनुसूचित जातीच्या व्यक्तींना मारहाण केली जाते. प्रत्येक आठवडयाला १३ अनुसूचित जातीच्या व्यक्तींचा खून होतो.
३. अनुसूचित जातीची सामाजिक, आर्थिक परिस्थिती:
    १. १७ % अनुसूचित जातीचे लोक दारिद्ररेषेखाली आहेत.
    २. ५४ % अनुसूचित जातीचे मुले कुपोषणग्रस्त आहेत.
    ३. हजारांपैकी ८३ अनुसूचित जातीचे लहान मुले कुपोषणाने एक वर्षात मृत्यु पावतात.
    ४. ४५ % अनुसूचित जातीच्या लोकांना लिहिता वाचता येत नाही.

४. अनुसूचित जातीच्या स्त्रीयांना स्त्री म्हणून भेदभावाची वागणूक मिळते.
५. ३० % अनुसूचित जातीच्या स्त्रीयांना मूलभूतसोयी मिळत नाहीत.
६. ३ % अनुसूचित जातींच्या वस्त्यांना आरोग्य खात्याचे अधिकारी, कर्मचारी भेट देत नाहीत.
७. ७.६ % खेडयातील अनुसूचित जातींना पोलीस स्टेशन जाण्यापासून रोखले जाते.
८. ३७.८ % सरकारी शाळांमध्ये अनुसूचित जातीच्या मुलांना वेगळे बसविले जाते.
९. ४८.८ % अनुसूचित जातींना पिण्याच्या पाण्यापासून रोखले जाते.
१०. ८५.३७% अनुसूचित जातींवरील अत्याचाराचे गुन्हे प्रलंबीत आहेत.
११. फक्त १५.७१ % गुन्हयांमध्ये आरोपीला शिक्षा होते.

**(मानवी हक्क आयोग आकडेवारी नुसार)**

**१.१५ . निष्कर्ष :**

१. सारणी क्र. १ नुसार महाराष्ट्रातील विभागवार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवर वर्ष २०१२ व २०१३ यांचा अभ्यास करता २०१३ मध्ये अत्याचारांच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याची दिसून येते.

२. सारणी क्र. २ नुसार अनुसूचित जाती व जमातीवर होणाऱ्या विविध अत्याचारांच्या संख्येत घट न होता अत्याचारांचा आकडा हा तीन वर्षांमध्ये वाढत राहिलेला आहेत.

३. सारणी क्र. ३ नुसार सवर्णा कडुन आज ही महार/नवबौध्द समाजावर अत्याचार करण्याचे प्रमाण अधिक आहे. यामागे सवर्ण समाज आजही महार/नवबौध्द समाजामध्ये जातीयतेच्या मानसिक भेदभावाच्या भावनेतून बघतो.

४. अनुसुचित जमातीवर होणारे अत्याचारांचे प्रमाण हे अनुसूचित जातीच्या तुलनेने काही प्रमाणात नगन्य असल्याचे दिसून येते.

५. उपलब्ध संशोधनाच्या आधारे हे निदर्शनास येते की, सवर्णाच्या जातीच्या विचार केला असता अनुसूचित जाती व जमातीवर अत्याचार करणाऱ्यांमध्ये मराठा सवर्ण समाज यांचे प्रमाण अधिक आहे.

६. ॲट्रोसिटी कायद्या अंतर्गत नोंद झालेल्या गुन्हयांमध्ये आरोपीला होणाऱ्या शिक्षेचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

७. ॲट्रोसिटी कायदा हे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी असूनही सवर्ण जातीकडून या कायद्या बद्दल गैर समज असल्याचे जाणवते.

८. नाशिक शहर व नाशिक ग्रामीण या दोन विभागात सर्वाधिक गुन्हे हे नाशिक ग्रामीण भागात घडून आल्याचे दिसून येते.

**१.१६. सारांश :**

ॲट्रोसिटी कायदा हा अनूसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांना सुरक्षिततेचा हक्क प्रदान करतो. जो पर्यंत अनुसूचित जाती व जमातीवर होणारे अत्याचार कमी होणार नाही तो पर्यंत हया कायद्याची नितांत गरज आहे. हा कायद्या अनुसूचित जाती व जमातीच्या समुदायातील व्यक्तींची मानवी अधिकारांचे संरक्षण करतो. पिडीत व्यक्तीला आर्थिक सहाय्य तात्काळ करुन त्याचा पुनवर्सन करण्यासाठी त्याला मदत केली पाहिजे. ॲट्रोसिटी कायद्याची जागृकता करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने विशेष प्रयत्य करणे आवश्यक आहे. ॲट्रोसिटी कायद्याचा गैर वापर करणाऱ्या संबंधीत व्यक्तींना कठोर शिक्षा झाली पाहिजे त्यामुळे कायद्याचा दुरुपयोग करणे कमी होईल. ॲट्रोसिटी कायद्याची कठोर अंमलबजावणी पोलीस यंत्रणेने करणे गरजेचे आहे. त्यामुळे या कायद्या बद्दल भिती निमार्ण होऊन अत्याचार करणाऱ्यांना प्रतिबंध होऊ शकेल. हा कायदा विशिष्ट जातीच्या विरोधात नसून तो अत्याचार करणाऱ्या कोणत्याही सवर्ण जातीच्या विरोधात आहे.

**१.१७. संदर्भ साहित्य :**


१. मोखाडे विल्सन, ॲट्रोसिटी ॲक्ट, सुधीर प्रकाशन, वर्धा, ६ डिसेंबर २००८.

२. शिंदे अंबादास, दात काढलेला वाघ ?, स्वर्णिय प्रकाशन, सोलापूर, १ जुन २०१४.

३. शिंदे महर्षी विठ्ठल, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्य प्रकाशन, २३ एप्रिल २००३.

४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नाशिक, जिल्हा दक्षता समितीचा अहवाल इतिवृत्त २०१३.

५. दैनिक लोकसत्ता, ५ जुलै २०१४.

६. दैनिक सम्राट, २८ जानेवारी २०१६. , दैनिक सम्राट, ३१ ऑगस्ट २०१६.

 ISSN -2349-3984

# कलाकृती सौंदर्यातील भव्यता एक निरिक्षण

प्रा. क्षिरसागर प्रशांत बब्रुवान
मराठी विभाग
वसंत महाविद्यालय केज
मो. ९८२३९१४०५१

सौंदर्यता आणि भव्यता हे कलेचे दोन्हीही स्वतंत्र विषय आहेत. आधुनिक काळी मराठी काव्यप्राप्ता मध्ये केशवसुत, रेंदाळकर इत्यादी कवी पासून सौंदर्याच्या चर्चाबरोबर भव्येतेची चर्चा होऊ लागली आहे. Beautiful शब्दाने सौंदर्याची कल्पना करता येईल तर Sublime असे भव्यतेला योजिता येईल. त्याच बरोबर भव्यता व सौंदर्य हा संकल्पने बरोबर 'चित्र' (picturesque) या संकल्पनेचाही इथे विचार व्हावयास हवा. या तिन्हीचा उल्लेख अनेक वेळा शिथिलपणे 'सुंदर' या शब्दाने केला आहे परंतु या तिन्ही संकल्पनामध्ये भेद भिन्नता जाणवते.

पाश्चात्य अभ्यासक 'कांट' याने सुंदरता व भव्यता या दोन्ही गोष्टी भिन्न भिन्न आहेत हे प्रारंभीच सांगितले आहे. त्या नंतर कमी अधिक प्रमाणात बर्कने विचार मांडले आहेत. ते असे, सौंदर्यात वस्तुचा आकार लहान असतो; सुंदर वस्तुचे बाहयांग मऊ गुळ गुळीत असते ती पुष्कळसी नाजुक असते. विविध वक्ररेषा असल्या तरी रंग मात्र ठळक मृदु असतो. उलटपक्षी भव्य वस्तुंचे आकार फार विशाल असतो त्याच्यामध्ये खडबडीतपणा असतो; व्यवस्थित पणाचा अभाव असतो. सौंदर्यात रेखेची सरलता? सुचित असली तरी, ती कळत नकळत वक्र होते. भव्य वस्तुत सरलतेवर भर असतो. फरक नकळत असतो. सौंदर्य गुढ, अस्पष्ट असु नये. भव्यता मात्र कृष्ण व उदासीनता सूचक असते, सौंदर्य कोमल, विलोभनिय भव्य हे भरीव प्रचंड असते. सुंदर वस्तुचा मनावर जो परिणाम होतो. त्याचे वर्णन असे करता येईल. सुंदर वस्तुंमध्ये आपल्या दर्शनाने पाहणाऱ्या मनावरील ताण कमी करण्याचे सामर्थ्य असते. आणि त्यामुळे मनाला एक प्रकारची द्रुतीव स्वस्थता असते. कोवरे किंवा निमुळती टोके या मध्ये बर्कला सौंदर्य दिसत नसे व त्याने बहुतेक सारा भर पदार्थाच्या मसृणतेवर (smoothness) दिला आहे. त्याचा स्वतःचा कल सौंदर्याच्या बाजुस झुकला आहे असे जाणवते.

**कांटचे मत :–**

कांट यापेक्षा अधिक खोलवर जातो. भव्य गोष्टीच्या दर्शनाने आपल्या मनोवृत्ती स्वास्थ किंवा शांत होत नाहीत. याउलट विचलित होतात. त्यामुळे आपल्या कल्पनाशक्तीस उत्तेजन मिळते पण या उत्तेजनाचे स्वरूप स्पष्ट नसते. सुंदर गोष्टी जशाच्या तशा आहेत त्या स्वरूपात केवळ दर्शनाने आपल्याला आनंद देतात तर भव्य वस्तूच्या दर्शनाने मनात इतर कल्पना येतात व त्यांचा परिणाम होतो. निर्सगामधील आपल्या भोवतालच्या बाहय प्रचंड शक्ती आपल्या मनात भव्येतीची कल्पना उद्भूत करतात. या शक्तीवर आपले प्रभुत्व चालत नाही, कित्येकवेळी भव्यता म्हणजे आकाराची

केवळ प्रचंडता ही होऊ शकते साता समुद्राच्या पलीकडे असणाऱ्या अनंताचा विचार भव्यता ही खरी भव्यता होय. भव्यतेचे इतर प्रकार सापेक्ष असतात. यापुढे आपण अगदी अगंतिक असल्याची भावना अनुभवास येत नाही आपल्या बाहेर निसर्गात असलेल्या भव्यतेचा प्रत्यय आल्याची जाणिव होऊन मनुष्य आपल्या स्वभावातील भव्यतेचे मुळ शोधु लागने हे कांटच्या भव्यतेच्या कल्पनेचे स्थुल स्वरूप होय.

रात्रीचे तारकांकित भव्य आकाश, अमर्याद पण शांत असा निळवर्ण सागर, शेकडो फूट दरीत उडी घेणारा जोगचा धबधबा, बर्फाच्छादित हिमालयातील प्रचंड उंच हिमशिखरे इत्यादी उदाहरण. भव्यतेची सुंदर होत. परंतु यामध्ये प्रचंडता व दणकट सामर्थ्यकल्पना प्रक्षकांच्या मनात प्रामुख्याने असली तरी, त्यामध्ये सुंदरतेचे एक वेगळेच आकर्षण आहे. परंतु याच भव्य गोष्टीच्या स्वरूपात काही प्रमाणात फरक पडल्यास आकर्षकता कमी होऊन भीती निर्माण होते. उदा. खवळलेला समुद्र, महापुर आलेली नदी, मेघाचा गडगडाट, किंवा मेघ गर्जेनेसह वरूणाचे अगमन इ. गोष्टी सामर्थ्याची जाणीव करून देणाऱ्या असल्या तरीही त्याची गुढ आकर्षकता आजिबात कमी झालेली नाही. कित्येक भव्यगोष्टीत मुळची आकर्षकता कमी प्रमाणात असते. उदा. महाबळेश्वरावरून दिसणाऱ्या कित्येक खोल दऱ्या, मैलच मैल पसरलेले वाळवंटी प्रदेश किंवा एकदम तुटलेले उंच पर्वताचे कडे, यामध्ये आकर्षकता कमी झालेली नसते तर गुढ आकर्षकता असते इ. उदाहरणे आपणास निर्सगातील भव्यतेची घेता येतील.

याउलट मानव निर्मित भव्यतेकडे पाहिले तर त्यामध्ये भीतीचा किंवा अगतिकतेचा आव कमी होऊन त्यामधील सामर्थ्याची व प्रचंडतेची जाणीव उत्पन्न करते. उदा कुतुबमिनार, बुलंद दरवाजा, ताजमहाल,गोल घुमट, भंडार दऱ्यासारखी प्रचंड मोठी धरणे, यमुना, नर्मदा, गोदावरी इ. नदयावरील बांधलेले मोठ मोठे पूल, त्यांच्या प्रचंडतेमध्ये भव्यता व आकर्षकता ही आहे बाहयगोष्टी पेक्षा मनुष्याच्या अंतरंगामध्ये ही भव्यतेचा प्रत्यय येतो तिला आपण उदाप्तता म्हणतो. सर्व जग विरूध्द असताना आपल्या तत्वास चिटकुन राहण्याची तत्वनिष्ठा देशाकरिता किंवा देश प्रेमा करिता वैभव व जिवित यांचा सर्वस्वी त्याग करण्याची तयारी, प्रतिप्रेमामुळे आपले स्वतंत्र्य आस्तित्व विसरून वेळ पडल्यास शीलाचा त्याग करणारी पतिव्रता किंवा पतिच्या निधनानंतर त्याच्या चितेवर स्वत:स जाळुन घेणारी परीत्यक्ता इ. सारख्या कृत्याद्वारे अथवा वर्तनातुन व्यक्तीच्या उदाप्तेची किंवा मानसिक भव्यतेचा प्रत्यय आपणास येतो. इ उदा. तुन काही ना काही प्रमाणात आकषर्कता असते म्हणुनच हे कलाकृतीचे विषय बनतात. त्यांना ललित वाङ्मयात स्थान मिळते. हा एक सौंदर्याचा प्रत्यय आपणास त्यापासुन येतो.

**इतर मते :—**

भव्यतेची मध्यवर्ती कल्पना इतर लेखकांनी आधारभुत मानली असुन त्याचे विवेचन त्या अनुरोधाने आले आहे. प्रमाणाची प्रचंडता हे भव्यतेचे मुळ आहे. असे 'प्राइस' म्हणतो. त्याच बरोबर अनंतत्व अमर्यादित पणा, ही त्याची कारणे होत. बाहयरुपाची एकरुपताही काही अंशी भव्यतेस

कारणीभूत होते. भव्यतेला एक प्रकारच्या कठोरपणा, गांभीर्य असेही म्हणतो. हॅझलिरच्या मते, सामर्थ्य किंवा शक्ती यापासून उदाप्ततेचा जन्म आहे. व वैषम्यामुळे तिला उठाव मिळतो.

भव्यतेची उपक्ती

भव्यता या कल्पनेकडे मि जाईन यांनी आपल्या The Aesthetic object या ग्रथांत ते थोडयाशा वेगळया दृष्ट्रीने पाहतात. त्याच्या मते सुंदर वस्तुत रेखा, आकार, संयोजना, रूप, द्रव्य, वस्तुमान (mass) इ सौंदर्यात्पदक घटक अत्यंत योग्य प्रमाणात व औचित्यास धरून एकत्र आल्याने सौंदर्याप्राप्ती होते कोणत्याही सुंदर वस्तुत हे सर्व घटक निर्दोषपणे एकमेकांस योग्य अशा प्रमाणात व पध्दतीने एकत्र आलेले असतात. निर्दोष सौंदर्य म्हणजे या घटकांची निर्दोष अशी मिळणी होय. या मिळणीत काही दोष शिरला किंवा उणिव राहिली की, विरूपतेस अथवा कुरूपतेस प्रारंभ होतो. कलेमध्ये सर्वांग सुंदर वस्तु शंभर टक्के निर्दोष मेलनाची असते तर कुरूप वस्तु शंभर टक्के चुकीच्या मेलनाची असते. या दृष्टीन पाहता भव्यता हे विरूपतेचे अधिक जवळ असते असुंदरतेचा अत्युत्कर्ष साधलेला असतो. भव्य वस्तु ही वस्तुमाणाच्या दृष्टिने ;उेंद्ध सदाष असतो. तिचे वस्तुमान इतर सर्व घटकांच्या मानाने फार मोठे भलतेच असते इतर घटकांचे प्रमाण कदाचित योग्य असेल, त्यांची जुळणीही उचितपणे झालेली असते, परंतु वस्तुमाणांचे प्रमाण इतर प्रत्येक घटकाशी अत्यंत चुकीचे म्हणजे फार आधिक झालेले असते याचे उदा. घ्यावयाचे झाले तर वादळ, पर्वत, तारकांकित आकाश इ. वस्तुमानाच्या घटकावर जादा भर दिला गेला तर त्यात दोष उत्पन्न होतो. वादळ भंयकर पर्वत प्रचंड अमर्याद अकाश असे म्हणता आपण म्हणतो यातील भव्यता वस्तुमान त्यातील रेखा, रूप, रंग, आकार संयोजन (Design) इ. सौंदर्यादायक तत्वाच्या मानाने फार जादा झालेले असते. या घटकांचे प्रमाण एकमकांच्या प्रमाणात उचित रूपात असतील तर तेवढयाचे सौंदर्यपुर्ती होत नाही कित्येक वेळा वस्तुमान अल्प असते तरी त्यातील भव्यता उदाज असते उद. पिलांचे रक्षण करण्यासाठी कुत्र्यांच्या अंगावर धाऊन जाणाऱ्या मांजरीत दिसते. भव्यतेच्या मनावरील परिणाम कसा होतो त्या विषयी ‘हॅमिल्टन’ असे म्हणतो की पुढील विवेचन सुंदर वस्तुच्या तुलनेत करण्यात आले आहे. सुंदर वस्तुच्या आकर्षणाचाच अनुभव आपल्यास येतो. ती मध्ये प्रेक्षकास दुर ठेवण्याचे सामर्थ्य त्यात नसते भव्य वस्तुमध्ये दोन्ही एकाच वेळी कार्य करीत असतात. जवळ जाऊन ती वस्तु पाहवयासी वाटते, परंतु तिच्या प्रचंड पणामुळे भय वाटुन मनुष्य माघार घेतो. कालीदासाने रघुराजा संबंधी म्हटल्याप्रमाणे भव्य वस्तु अभिगम्य असतात. सुंदर वस्तुच्या दर्शनाने होणारे सुख निर्भळ असते. त्यात आपल्या ज्ञानशक्तीना पुर्णपणे व अप्रतिहात असा वाव मिळतो भव्यवस्तुच्या दर्शनाचा परिणाम मिश्र असतो. त्यातील सुखांचा भाग त्या वस्तुच्या सामर्थ्याच्या जाणिवेने आलेला असतो, तर त्यातील प्रतिकुल संवेदना हे सामर्थ्य किंवा शक्ती व्यर्थ आहेत. या जाणिवेने होते. परंतु भव्यवस्तुच्या दर्शनाने होणारी अनुकुल संवेदना प्रतिकुल संवेदनेपेक्षा आधिक असते. या अर्थी आपल्या ज्ञानशक्तीना त्यात जेवढा अडथळा होतो, त्या मानाने स्वतंत्र्यास वाव आधिक मिळत असला पाहिजे सौंदर्यास आकारचा मोठेपणा विरोधी होतो. भव्यतेस मात्र तो आवश्यक असतो भव्यवस्तुच्या दर्शनाने आपल्यास एकाच वेळी आकर्षण व अपसारण यांचा अनुभव येतो. याचे कारण आपल्या ज्ञानशक्तीपैकी एकीस तो

पुळतो व दुसरीस जुळत नाही, हे असते. भव्यता काल दिक आणि सामर्थ्य या तीन प्रकारची असते, असे हॅमिल्टन म्हणतो.

**निष्कर्ष :–**

१ सौंदर्यतेमध्ये वस्तुचा आकार लहान, नाजुक, मृदु, तरलता असते याउलट भव्यतेचा आकार विशाल स्वरूप, अव्यवस्थीत, खडबडीत असते.

२ सौंदर्यामुळे वस्तु पाहण्याऱ्याचा मनावरील ताण कमी करण्याचे सामर्थ्य असते तर भव्यतेमध्ये अचंबिता असते.

३ भव्यवस्तुच्या दर्शनाने अस्पष्ट स्वरूपाच्या प्रचंड अद्‌भुत कल्पनाशक्तीस उत्तेजन मिळले तर

४ निर्सगात असलेल्या भव्यतेचा प्रत्यय आल्याची जाणीव झाल्या नंतरच मनुष्य आपल्या स्वभावातील भव्यतेचे मुळ शोधु लागतो.

५ प्रमाणाची प्रचंडता हे भव्यतेचे मुळ आहे असे प्राइस म्हणतो तसेच भव्यतेत एका प्रकारचा कठोरपणा, गांभीर्य असते असे म्हणतो.

६ सामर्थ्य आणि शक्ती या पासून उदात्तेचा जन्म होऊन वैषम्यामुळे तिला उठाव मिळतो असे हॅझलिट म्हणतो.

७ निर्दोष सौंदर्य म्हणजे रेखा, आकार, संयोजना, रूप, द्रव्यवस्तुमान इ. घटकांची निर्दोष अशी मांडणी होय.

८ भव्यतेत असुंदरता, अत्युत्कार्ष, वस्तुमानाची प्रचंडता असते ती वस्तुमानाच्या दृष्टीने सदोष परंतु इतर वस्तुमानाच्या सर्व घटकांच्या मानाने प्रचंड असते.

९ सुंदर वस्तुच्या दर्शनाने होणारे सुख निर्भेळ, ज्ञानशक्तीस वाव देणारे असते तर भव्यवस्तुच्या दर्शनाचा परिणाम किश्र स्वरूपाचा असुन त्यात सुखाचा भाग वस्तुच्या अनुकुल संवेदना, सामर्थ्यच्या जाणिवेने आलेला असतो.

**संदर्भग्रंथ :–**

१ डॉ. ढ. भि कुलकर्णी, अनन्यता मर्ढेकरांची, पदमागंध प्रकाशन पुणे
२ बासी मर्ढिककर, सौंदर्य आणि साहित्य
३ बा.सी. मर्ढेकर, सौंदर्यशास्त्र
४ रा. श्री. जोग, काव्यशास्त्रप्रदीन
५ सुरेश धायगुडे, पाश्चात्य साहित्यशास्त्र

 ISSN -2349-3984

# मुस्लीम समाज: आर्थिक दुर्बलता आणि शिक्षण

शेख अमर अनिस
MSW
मानवलोक समाज विज्ञान
महाविद्यालय, अंबाजोगाई

**प्रस्तावना:**

स्वातंर्त्यानंतर आपल्या देशाने शैक्षणिक, आर्थिक, व औद्योगिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. तसेच व्यक्तीचे आरोग्य, साक्षरता, गरिबी कमी करणे या क्षेत्रात ही समाधान कारक प्रगती केली आहे. असे असले तरी या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व धार्मिक व भाषिक अल्पसंख्य घटक व जमाती यांना सारख्या प्रमाणात मिळत नसल्याचे चित्र मात्र अजून तरी दिसून येत नाही. भारतीय मुस्लीम समाज हा देशातील सर्वात मोठा अल्पसंख्य समाज असून देशाच्या एकूण लोकसंख्येत त्याचे प्रमाण १४% आहे. इतका मोठा समाज मानवी विकासाच्या प्रक्रियेत मात्र खूपच मागे राहिलेला दिसून येतो. आपल्याला विकासाच्या संधी पासून वंचीत ठेवण्यात आल्याची एकप्रकारची उदासीनतेची भावना मात्र या समाजात दिसून येत आहे.

भारतातील OBC, SC, ST या समाजापेक्षा भारतीय मुस्लीम समाज सर्वच क्षेत्रात मागासलेला आहे" सच्चर समितीचा अहवाल जानेवारी २००७ मध्ये संसदेला सादर करण्यात आला त्यात वरील निष्कर्ष नोंदला आहे.

मुस्लीम समाजाने आज पर्यंत आपल्या परीने इतर भारतीय समाजाबरोबर आपली थोडी फार प्रगती केली आहे त्यात वाद नाही, असे असले तरी इतर अल्पसंख्याक समाजाशी तुलना करताना असे दिसून येते की, आर्थिक व शैक्षणिक प्रगती करण्यात मुस्लीम समाज इतरापेक्षा खूपच मागे आहे हे अंतर खूप मोठे आहे आणि दिवसेंदिवस वाढतच आहे.

**उद्देश :**

१ मुस्लीम समाजाच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
२ मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे

**गृहीतके :**

१ मुस्लीम समाजाची आर्थिक स्थिती बिकट आहे.
२ मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

**संशोधन पद्धती :**

सदरील संशोधनात तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोत पद्धती चा वापर करण्यात आला असून या मध्ये पुस्तके, मासिके, व इंटरनेट चा वापर करण्यात आला आहे.

**आर्थिक दुर्बलता:**

समाजातील ज्या घटकाकडे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत जसे शेती, उद्योगधंदे, नौकरी यांचा अभाव आहे व जे दैनंदिन जीवनातील आवश्यक गरजांची पूर्तता करण्यास असमर्थ आहेत, त्यामुळे त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्या घटकास आर्थिक दुर्बल घटक असे संबोधता येईल.

भारतातील मुस्लीम समाज हा आर्थिक दृष्ट्या खूपच दुर्बल असल्याचे आपल्याला दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने त्यांना योग्य त्या नौकरीची संधी लाभत नाही. व त्यांना रोजगाराकडे वळावे लागते. १९५५ साली पहिल्यांदा केळकर कमिशनने देशातील २३९९ मागास जाती–जमातींची यादी सरकारला सादर केली. त्यामध्ये ८३७ जाती जमातींचा उल्लेख अतिमागास वर्गात करण्यात आला होता. त्याच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी विशेष लक्ष देण्याची गरज आहे, असेही नमूद करण्यात आले. या मध्ये मुस्लीम मागास जातींचा हि समावेश होता.

भारतातील बहुसंख्य लोक मुख्यत्वे ग्रामीण भागात किंवा अर्धशहरी भागात राहत होते, मुस्लिमांच्या बाबतीत सुद्धा अशीच परिस्थिती होती. तथापि मुस्लिमांच्या शहरीकरणाचे प्रमाण इतरापेक्षा अधिक असल्याचे दिसते तर २७.१% मुस्लीम लोकसंख्या शहरात राहत असल्याचे दिसते. हे प्रमाण पुढेही असेच राहिल्याचे स्पष्ट होते. याचे मुख्य कारण ग्रामीण भागातील शेती व्यवसाय हाच असून त्याची मालकी इतर समाजापेक्षा मुस्लीम समाजाकडे आपल किंवा नगण्य असल्यामुळे रोजगाराच्या शोधात हा समाज शहराकडे जात असल्याचे दिसते.

**मुस्लीम समाजाची नौकरी, व्यवसाय आणि आर्थिक स्थिती :**

इतर सर्व भारतीय समाजातील स्त्री–पुरुष यांच्या नौकरी संदर्भात विचार केल्यास भारतीय मुस्लीम समाजातील स्त्री–पुरुष नौकरदारांची व रोजगार करणाऱ्यांची संख्या यात तुलनात्मक अंतर खूप मोठे असल्याचे दिसून येते. मुस्लीम रोजदारांची व नौकरी करणाऱ्यांची संख्या कमी असण्यामागे मुस्लीम स्त्रियांचा या मध्ये सहभाग नसणे, हेही एक महत्वाचे कारण आहे. मुस्लीम स्त्री गृहिणी म्हणून केवळ घरकाम करणारी व मुलाबाळांचा सांभाळ करणारी म्हणूनच राहते.

**स्वयंरोजगार :**

लहान मोठे स्वयंरोजगार करण्याची वृत्ती भारतीय मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात दिसून येते. शहरी भागात स्वतंत्र लहान उद्योग करणाऱ्यात मुस्लीम स्त्रियांची संख्या बरीच आहे. ६१% मुस्लीम हे स्वयंरोजगारात गुंतलेले असून इतर सर्व हिंदू समाजात हेच प्रमाण ५५% इतके आहे. केवळ स्त्री कामगारांचा विचार केला तर शहरी भागात मुस्लीम ७३% व हिंदू ६०% असे प्रमाण आहे.

**पगारी नौकरी :**

सरकारी व खाजगी उद्योगांचा विचार केल्यास असे दिसून येते, कि पगारी नौकर म्हणून काम करणाऱ्या मुस्लिमांची संख्या फारच कमी आहे. या ठिकाणी त्यांना नौकरीची संधी मिळत नाही. हि फार चिंतेची बाब आहे. एकूण लोकसंखेच्या प्रमाणात मुस्लीमापैकी फक्त २७% मुस्लीम पगारी नौकरीवर आहेत. सार्वजनिक शासकीय (PSU) उद्योगातील मुस्लीम नौकरी भरती ६% पेक्षाही कमी

आहे. २००९-१० पासुन २०११–१२ पर्यंत महाराष्ट्र केडरमधील आय.ए.एस अधिकाऱ्यांची संख्या पहिली तर मुस्लीम अधिकाऱ्यांची संख्या प्रत्येक वर्षी ०२ राहिली आहे. २०११ मध्ये भारतीय पोलीस सेवेत २०३ उमेदवार निवडले गेले. त्यात अवघे चार मुस्लीम होते.

**सुरक्षितता व संरक्षण दलातील सहभाग** :

सुरक्षितता व संरक्षण दलात मुस्लीम समाजाचा सहभाग किती प्रमाणात आहे. हे समजून घेणे फार महत्वाचे आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीत असणाऱ्या या दलात केवळ ०६% मुस्लिमांना नौकरी असल्याचे दिसते, तर राज्य सरकारच्या नौकरीत हे प्रमाण ०७% आढळते. भारतीय संरक्षण दलात मुस्लीम समाजाचे प्रमाण केवळ ४% असल्याचे दिसून येते

**इतर व्यवसाय** :

शेती व्यवसायात गुंतलेल्या एकूण ५८% भारतीयांचा विचार करता मुस्लीम समाज आपल्या एकूण लोकसंखेच्या ४०% प्रमाणातच या व्यवसायात गुंतलेला आहे. स्त्री कामगारांचा विचार केला असता ५२% मुस्लीम स्त्रिया यात काम करतात. तर फक्त ३६% मुस्लीम पुरुष शेती हा व्यवसाय करतात.

कापड तयार करण्याच्या विशेषत: मागावर कापड विणण्याच्या व्यवसायात मुस्लीम स्त्री–पुरुष कामगार मोठ्या संख्येने काम करतात. कपडे शिवणे व त्यावर काही प्रमाणात नक्षी करणे, रेडीमेड कापड व्यवसाय करणे, या सर्व प्रकारच्या व्यवसायात २१% स्त्रिया व २८% पुरुष गुंतलेले आहेत. तसेच रोड ट्रान्सपोर्ट व्यवसाय (यामध्ये गाडी दुरुस्त करणेही येते.) स्टेशनरी वस्तूंचा किरकोळ व्यापार करणे इत्यादी व्यवसायात मुस्लीम पुरुष अधिक करून गुंतलेले दिसतात.

**मुस्लिम समाजाची उत्पन्ना विषयक स्थिती**:

उत्पन्न हा एक मानवी जिवन जगण्यासाठी महत्वाचा प्रवाह आहे. कारण मनुष्य पैसाशिवाय कोणत्याही हालचाली करू शकत नाही. मानवी जिवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मुलभूत गरजांची पुर्तता होणे आवश्यक असते. उत्पन्न हे साधारणपणे आर्थिक बाबतीत वापरले जात असून उत्पन्नामध्ये घरघुती वस्तु, वेतन, पगार, नफा आणि दैनंदिन व्यवहारात वापरण्यात येणारा पैसा इ. घटकांचा समावेश होतो. जिवनामध्ये व्यक्तीला मिळालेल्या एकूण उत्पन्नामधुन तो उपभोग्य वस्तु,अन्नधान्न, शिक्षण, आरोग्य आणि कपडे इ. घटकांवर खर्च करत असतो. परंतु प्रत्येक व्यक्ती आपल्या उत्पन्न किंवा त्याच्या वेतनानुसार खर्च करत असतो. कारण काही व्यक्तीचे उत्पन्न हे जास्त तर काही व्यक्तींचे कमी म्हणजेच उत्पन्न जास्त असले तर त्या व्यक्तीचे खर्चाचे प्रमाणही जास्त असते

**मुस्लिमांची दारिद्रर्य रेषेखालील कुटुंबसंख्या**

२००४–२००५ च्या सच्चर आयोगाच्या अहवालानुसार ३१ टक्के मुस्लीम समाज दारिद्रय रेषेखाली होत. या तुलनेत एससी एसटी ३५ टक्के, ओबीसी २१ टक्के आणि खुल्याप्रवर्गातील ८.७ टक्के कुटुंब दारीद्रय रेषेखाली होते. National Council for Applied Economic Research (NCAER) च्या सर्व्हे नुसार प्रत्येक १० कुटुंबापैकी ०३ कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत.

### मुस्लिम समाजाची शैक्षणिक स्थिती

शिक्षण ही एक सामान्य ज्ञान प्राप्त करण्याची प्रणाली आहे. शिक्षणाने मानवी जिवनाचा विकास होऊन त्याच्या अंगी ज्ञान,कौशल्य इ. गोष्टी अवगत होतात. शिक्षणाद्वारे ज्ञानाची देवाण घेवाण करता येते. आजच्या काळामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्व प्राप्त झाले असुन शिक्षण घेणे आणि शिक्षण देणे या शिक्षणाच्या दोन्ही बाजु एकमेंकावर परिणाम करीत असतात. अलिकडच्या काळामध्ये सरकारने शिक्षण हक्क अधिकाराला मान्यता दिली आहे. कारण शिक्षण घेणे हा मानवाचा अधिकार आहे आणि तो त्या व्यक्तीपासून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. "व्यक्तीच्या बौध्दीक, मानसिक व सांस्कृतिक विकासास कारण असणारे जे ज्ञान असे ते शिक्षण होय. अशाप्रकारे शिक्षण शब्दाची व्यापक अर्थाने व्याख्या करता येते.

व्यक्तीच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीचा स्तर उंचावण्यासाठी शिक्षण हे अतिशय महत्वाचे साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीला उत्तम जीवन जगण्याची संधी प्राप्त होते. भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्वातील कलम ४५ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे, की "देशातील सर्व मुलांना वयाच्या १४ व्या वर्षा पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे" सक्तीचे मोफत शिक्षण हा नागरिकांचा मुलभूत हक्क आहे.

मुस्लीम समाजाच्या शिक्षणाचा विचार केल्यास त्यांना अतिशय कमी दर्जाचे व कमी गुणवत्तेचे शिक्षण मिळते असे दिसून येते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील ३० % आणि शहरी भागातील २५% मुस्लीम समाज हा आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षणापासून वंचित असल्याचे एका सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे.

### शालेय नावनोंदणी प्रमाण

मुस्लीम समाजातील ६ ते १४ वयोगटातील नावनोंदणीक्षम मुलांपैकी २५% मुले अजिबात शाळेत जात नाहीत किंवा मधेच शाळा सोडून देतात. हे प्रमाण चिंताजनक आहे. मुस्लीम समाजाच्या व्यतिरिक्त जर इतर समाजाचा विचार केला तर इतर समाजातील मुलांची शालेय गळती फारच कमी असल्याचे आपल्याला दिसून येते.

मुस्लीम समाजातील शालेय गळतीचे प्रमाण जास्त असण्याच्या कारणांचा जर अभ्यास केला तर आपल्याला असे दिसून येते की, मुस्लीम समाजात शिक्षणाबाबत ची जागरूकता हि फार कमी आहे. आणि दुसरे कारण म्हणजे मुस्लीम समाजाची आर्थिक दुर्बलता हे दोन कारणे शाळा गळतीला जबाबदार ठरतात.

### प्राथमिक व माध्यमिक शिक्षण

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गटात ग्रामीण भागात मुस्लीम मुला—मुलींचे प्रमाण आजही फार कमी आहे. पहिली ते चौथी पर्यंत काही उर्दू शाळे मध्ये तर अवघे १०—१२ विद्यार्थीच दिसून येतात.

दहावी पर्यंत शिक्षण पूर्ण करणाऱ्या १६—१७ वयोगटातील केवळ १७% मुस्लीम विद्यार्थी दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. इतर गटात मात्र हे प्रमाण २६% आहे. १२ वी पर्यंत चे शिक्षण

केवळ ५०% मुस्लीम मुले पूर्ण करतात. इतर गटात मात्र हे प्रमाण ६२% आहे. हि एक गंभीर बाब आहे.

**उच्च शिक्षण**

२० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयोगटातील मुले डिप्लोमा किंवा विविध डिग्री शिक्षण पूर्ण करतात. त्या पायरी पर्यंत केवळ ४% मुस्लीम विद्यार्थी पोहचतात. त्यात ही टेक्निकली क्वालीफाईड असे ०.४% असे आढळतात. व हे प्रमाण मुस्लीम समाजातील शैक्षणिक दुर्बलता दर्शवण्यास पुरेसे आहे.

**निष्कर्ष**

१. मुस्लीम समाजात नौकरीचे प्रमाण कमी असल्याने व व्यवसायात सातत्य नसल्याने मुस्लीम समाजाची आर्थिक स्थिती ही अत्यंत दैनीय आहे.

२. मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण हे हे खूप कमी आहे. उच्च शिक्षणाचा विचार केल्यास मुस्लीम विद्यार्थ्यांची संख्या फार कमी दिसून येते.

**सूचना**

१. सरकारी नौकरी मधील मुस्लीम समाजाची भागीदारी त्यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात वाढवली गेली पाहिजे.

२. मुस्लीम समाजाच्या सरकारी व प्रायव्हेट सेक्टर मधील नौकरी भरतीत पारदर्शकता असली पाहिजे.

३. मुस्लीम समाजाचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढले पाहिजे या साठी प्रयत्नांची गरज असून शिक्षण संस्थांच्या अनुदानात वाढ करून काही प्रमाणात मुस्लीम विद्यार्थ्यांना अधिक प्रवेश व सवलती देण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे.

**संदर्भ**

१. यदुनाथ थत्ते, मुस्लीम समाजातील वाहते वारे, मानसन्मान प्रकाशन पुणे १९९१.

२. हाजी महंमद गौस नाईक, सच्चर का सच, मुस्लीम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था प्रकाशन, कोल्हापूर २००७

3- http://timesofindia.indiatimes.com/india/31-Muslims-live-below-poverty-line-NCAER-survey/articleshow/5734846.cms

4- http://www.milligazette.com/news/13003-the-percentage-of-indian-muslims-living-below-poverty-line

5- http://www.irfi.org/articles/articles_901_950/where_do_muslim_stand__in_india.htm

# कौटुंबिक हिंसा : शारीरीक व माणसिक छळ एक व्यष्टी अध्ययण

**मार्गदर्शक**
डॉ. प्रकाश जाधव
प्राचार्य मानलोक समाज
विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई.

**सादरकर्ते**
प्रियंका नारायणकर
विद्यार्थी एम.एस.डब्ल्यू

**गोषवारा :**

जागतिकीकरणानंतर दारिद्रय बेकारी वाढली नागरी भागातील समस्या तीव्र झाल्या शहरांना सुज आली व दुसऱ्या बाजुने खेडे ओस व भकास होऊ लागली. शहरी सुविधा स्त्रीया पर्यंत पोंहचल्या नाही याचाच परिणाम कौटुंबिक हिंसाचार अन्याय अत्याचार स्त्रीयांना सहन करावा लागत आहे.

स्त्रीयासाठी अनेक कायदे करण्यात आले. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५,२००६(२६ ऑक्टोबर २००६ पासून अमलात आले) परंतु त्या कायदयाची योग्य अंमलबजावणी होते का आजही स्त्रीयांना कोणत्याच बाबतीत स्वातंज्य मिळाले नाही असें दिसुन येते.

स्त्रीयांच्या घरातील व कुटुंबातील छळ यात नवीन काही नसले तरी त्याचे स्वरूप सारखे विस्तारीत आहे. हेच खरे दुर्दैव आहे. स्त्रीला आपण देवी अगर दैत्या मानले तर कधी अबला मानण्यात आले. कधी पण माणुस मानण्यात आले नाही.

**प्रस्तावना :**

स्त्री व पुरूष हे कुटुंबसंस्थेचे प्रमुख आधार आहेत. संसारातील हे दोन चाके समजली जातात. पुरूषांच्या जीवनामध्ये स्त्रीयांचे स्थान अंत्यत अर्थपुर्ण व प्रभावशाली व महत्वाचे मानले जाते. परंतु धार्मीक रूढी, परंपरा, रीतिरिवाज यामुळे स्त्रीयांना दुय्यम वागणुक दिली जाते. स्त्रीयांना अनेक ठिकाणी आजही अपमाणीत व्हावे लागते. त्यांचे शोषण केले जाते. कुटुंबातच त्यांना अनेक व्यक्तीकडून जाणीवपुर्वक त्रास दिला जातो.

स्त्रीयांना प्रत्येक देशात विविध स्तरावर अत्याचार कुटुंबातून सुरू होवून येथेच संपत नाही तर समाजातुन व राजकारणातुन होत असल्याने दिसुन येते. महिला ही कोणत्याही वयातील, वर्गातील, जाती धर्मातील असली तरी तिच्यावर हिंसा होत असते.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

इतिहासापूर्व संस्कृतीमध्ये स्त्रीयांचे उत्पादनातील आणि पुनरूत्पादनातील योगदान मोलाचे होते. तिला पुरूषाच्या बरोबरीने वागण्याचा अधिकार दिला गेलेला होता. स्त्रीयांना शिक्षण, धर्म, राजनीती, संपत्ती, उत्तराधिकार या सर्व बाबतीत समान अधिकार होते.

त्या काळात महिला शिवाय पुरूषांचे जीवन अपूर्ण होते. स्त्रीयांच्या घरातील व कुटुंबात छळ यात नवीन काही नसले तरी त्याचे स्वरूप सारखे विस्तारीत आहे. हेच खरे दुदैव आहे. स्त्रीला आपण देवी अगर दैत्या मानले तर कधी तीला माणूस माणन्यात आले नाही.

इतिहासपुर्व संस्कृतीमध्ये स्त्रीयांचे उत्पादनातील आणि पुनरूत्पादनातील योगदान महत्वाचे होते. वैदिक कालखंडात स्त्रीयांना दर्जा होता, पितृसत्ताक व्यावस्था होती परंतु स्त्रीयांचे जिवन हे सुखी समाधान व स्वतंत्र होत, परंतु याच काळात वैदीक संहिता, उपनिषदे स्त्रीयांची कार्यक्षेत्रे मर्यादीत केली.

मध्ययुगीन कालखंडात सुलतानशाहीने स्त्रीयांवर अनेक बंधने घातली याच काळात बाल विवाह, सती प्रथा, विधवा महिलांच्या समस्या इत्यादी अनेक समस्या निर्माण झाल्या. ब्रिटीश राजवटीत स्त्रीयांना विविध कायदे करून न्याय देण्याचे कार्य केले आहे. तसेच हिंदू कोंड बीलमध्ये स्त्रीयांना एक प्रकारचा दर्जा, अत्याचार कमी करावा यासाठी एकुण २० कायदे केले आहे. परंतु प्रधान संस्कृतीला मान्या नसल्याने या हिंदु कोड बीलाचा उपयोग झाला नाही. घटनेतील कलम १४ नुसार स्त्री पुरूष समानता, १५ व्या कलमानुसार स्त्री पुरूष असा भेद केला जाणार नाही व ३२६ व्या कलमानुसार प्रौढ मतदानाचा अधिकार स्त्री पुरूषांना देण्यात आला आहे. तसेच हिंदुच्या सामाजिक रूढीतील व कायदयातील दोष टाळण्यासाठी अनौतिक व्यापाराला आळा घालणारा कायदा हिंदु विवाह कायदा, हुंडाबंदी कायदा, हिंदू उदरनिर्वाह व दत्तक कायदा इत्यादी अनेक कायदे करून भारतीय संसदेने मानवतेचे तत्व आमलात आणले व हजारो वर्षापासून चालु असलेल्या जाचक चालीरिती बंद केल्या. परंतू जागतिक पातळीवर अत्याचाराचे प्रमाण दिवसेनदिवस वाढतच आहे. पूढिल तक्त्या वरून देशाचे खरे सत्य पाहता येईल.

| अ. क्र | देश | शारीरिक | | लैंगिक | | शारीरिक आणि लैंगिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्षभर | जन्मभर | वर्षभर | जन्मभर | वर्षभर | जन्मभर |
| १ | ऑस्ट्रेलिया | ४ | २५ | १ | ८ | ४ | २७ |
| २ | बांग्लादेश | १५.८ | ४१.७ | २४.२ | ४९.७ | ३१.९ | ६१.७ |
| ३ | बेल्जिअम | १.९ | — | ०.९ | — | — | — |
| ४ | भारत | २१.४ | ३५.१ | ७.२ | १० | २३.९ | ३७.२ |
| ५ | जपान | ३.१ | १२.९ | १.३ | ६.२ | ३.८ | १५.२ |
| ६ | यु के | २.७ | १८.९ | ०.२ | ३.८ | ५.९ | २८.४ |
| ७ | अमेरिका | १.३ | २२.१ | ०.२ | ७.७ | १.५ | २४.८ |




(Source: Violence against women prevalence data surveys by country as of December 2012 www.nuwomen.org)

**कौटुंबिक हिंसा :**

स्त्रीयावरील हिंसा ही सर्व प्रथम कुटुंबातून होत असते त्यात सासु, सासरे, ननंद कुटुंबातील इतर व्यक्तीकडून देखील होत असते. स्त्रीयांना कौटुंबिक जीवनाची अधिक ओढ असल्याने त्या पुरूषापेक्षा उत्पादन क्षमतेत कमी पडतात असे म्हटले जाते. परंतु आजच्या स्त्रीयां घरकाम आणि उत्कृष्ट पणे काम करताना दिसतात.

| अ. क्र | अवस्था | हिंसाचाराचे प्रकार |
|---|---|---|
| १ | जन्मापूर्वी अवस्था | लिंगवर आधारीत गर्भापात, गरोदरपणात मारहाणीचे प्रसंग |
| २ | अर्भक अवस्था | शारिरीक, लैगिंक आणि मानसिक छळ |
| ३ | बालीक अवस्था | बलविवाह, लैंगिक, मानसिक छळ, बालवेश्या, लिंगबदल, अश्लिल छायाचित्रिकरण |
| ४ | किशोर अवस्था | ॲसीड फेकणे व बलात्कार |
| ५ | पौढ अवस्था | पैशासाठी लैगिंक छळ, शाळेतील मुलींचा लैगिक वापर, शालेय कामाच्या ठिकाणी रेप, हुंडाबळी |

**हिंसेचे प्रकार :**

१) शारिरीक हिंसा :— शरिरीक इजा व महिलांच्या प्रसुतीस बाधा आनणे, हल्ला करणे, जिवाला धोका करणे इत्यादी.

२) लैंगिक हिंसा :— लैंगिक हिंसा म्हणजे असे कृत्य की ज्यामुळे महिलेचा अपमान, मानहानी होणारे कुत्य करणे.

३) मौखीक हिंसा :— अपमान, टाकुन बोलणे, शिव्या शाप देणे, पोर होत नाही म्हणून टाकुन बोलने तसेच शारिरीक इजा पोहंचवणे, वारंवार धमकी देणे इत्यादी.

४) अर्थिक हिंसा :— अर्थिक उत्पन्नापासुन महिलेला वंचित ठेवणे, अर्थिक उत्पन्नावर बंदी किंवा अर्थिक सुविधा न मिळू देणे इत्यादी.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

पूर्वी समाजात स्त्रीला फार महत्वाचे स्थान होते. तिला पुरूषाच्या बरोबरीने वागण्याचा अधिकार दिला गेलेला होता. स्त्रीयाना शिक्षण, धर्म, राजनिती, संतत्ती, उत्तराधिकार या सर्व बाबतीत समान अधिकार होते.

हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रीया आजपर्यंत स्वत:च्या नशिबाचे भोग म्हणुन निमुटपणे या हिंसाचाराला सहन करीत आहे. स्त्रीया हिंसाचाराला बळी पडत आहेत. भर रस्त्यावर त्याची छेड काढली जाते, जिवंत जाळण्यात येत आहे. महिलावरचे अत्याचार करणाऱ्या लोकांना योग्यती शिक्षा देऊन त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला पाहिजे. म्हणून सद्यस्थितीत महिलावर कोणकोणते शारीरी व माणसिक हिंसा होतात यांचे अध्यायण महत्वाचे वाटते.

**उद्देश :**

१) कौटुंबिक अत्याचार झालेल्या महिलाचे कौटुंबिक परिस्थितीचे अध्यायन करणे.

२) कौटुंबिक हिंसागृस्त महिलाचे शारीरीक व माणसिक हिंसाचे अध्यायण करणे.

३) सद्यस्थितीत महिलांच्या कार्याचा आढावा घेणे.

**तथ्यसंकलन :**

सदरील संशाधनाचे तथ्य संकलन प्राथमिक स्त्रोताचा वापर करून व प्रत्यक्ष मुलाखत घेऊन माहिती संकलित केलेली आहे. द्वितीय स्त्रोतात पोलिस स्टेशन, पुस्तक शोध निबंध व संदर्भ ग्रंथ इत्यादी द्ववारे माहिती संकलन केले आहे.

**व्यष्टी अध्ययण :**

नव :– अलका धनंजय पौळ, वय :– २८ वर्ष, शिक्षण :– ८ वी पास

जात :– कोळी, धर्म :– हिंदु, पत्ता :– मु. पो. टोकवाडी ता. परळी जि. बीड.

श्रीमती अलका धनंजय पौळ कौटुंबिक हिंसाचार २००६ अन्वये पती विरूध्द ४९८ (अ) असा गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे. अलका यांचा विवाह संयुक्त कुटूंब पध्दतीत झाला त्या कुटुंबात सासू, सासरे, दीर, जावू व त्यांची मूले धनंजय पती एकत्र राहतात. पती व तिचे दीर हे किराणा दुकान चालवतात. यांचा मुलगा पाचवी पर्यंत शिकुन शाळा सोडून दीलेली आहे. घरात सतत तणावपूर्ण वातावरण असल्याने मुलाकडे लक्ष देता आले नाही याचा परिणाम म्हणून मुलानी शाळा सोडून दिली. पती हा व्यसनी आहे. व्यसनाधिनतेमुळे पती–पत्नीचे शुल्लक कारणावरून पत्नीला शारिरीक व मानसिक छळ करत असे. शारिरीक छळामध्ये मारहाण करणे हा छळ देण्यात सासुचा सुध्दा समावेश होता. दारू पिण्यास विरोध केल्याने पती धनंजय नेहमी पत्नीला मारहान करत असे. अलका हिने आपल्या आई वडिलांना सांगितले अलका हिच्या आई वडिलानी पतीची समजुत काढण्याचा प्रयत्न केला परंतु यांचा काहीही उपयोग झाला नाही. तीला दिवसातून एकदा तरी मारत असे. मारहाणीत केस ओढणे, पायाणे मारणे, रात्रीच्या वेळी दारू पिवुन मारहाण होत असे. तसेच सासुकडून सुध्दा माणसिक त्रास होत होता. तिने काम चांगले केले नाही म्हणून शिव्या दिल्या जात असे. ननंद सुध्दा माहेरी आल्यावर सर्व घराची कामे करून घेत असे. त्यांना दोन एक्कर शेती होती. तीच्याकडून शेतीचे सुध्दा काम करून घेत असे. हा त्रास चार पाच वर्षापासुन सुरू होता. शेवटी अलकाने कायदयाची मदत घेऊन पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवला तिच्या पतीला एका वर्षाची शिक्षा झाली. सध्या अलका तिच्या आई वडिलाच्या शेजारी एक खोली करून वेगळी राहते. ती घरकाम, शेतकाम, मजुरी जे मिळेल ते काम करून आपल्या मुलांचे पालन पोषन करते. पुरूषाने मुलांना जन्म दयावयाचे व असे प्रसंग आल्यास पत्नीच्या हवाली करावयाचे खूप कठीण परिस्थीती सुध्दा स्वत:चे व मुलांचे मोलमजूरी करून जिवन जगत आहे. आपली जबाबदारी पार पाडते ही जबाबदारी पार पाडत असताना तीला अनेक अडचणी येतात. ती कामावर गेल्यावर लोकांच्या वाईट नजरेचा तीला त्रास होतो. परंतु ती धैर्याने हया सर्व समस्याना सामोरे जाते.

**निष्कर्ष :**

१) कौटुंबिक हिंसाचाराची सुरूवात ही त्यांच्याच कुटुंबातुन झालेली आहे. त्यात पती व कुटुंबातील सदस्याकडून हिंसा झालेली आहे.

२) कुटुंबातील कलह वाढत जावून मुलांसमोर महिलांवर कौटुंबिक हिंसाचार होत असल्यामुळे मुले आपल्या पालकांना घाबरत असल्याचे दिसुन आले.

३) हिंसेच्या प्रकारात शरिरीक आणि मानसिक छळाचा समावेश आहे.

४) स्वत:चा व त्यांच्या मुलांचे पालन पोषण हिंसाचारग्रस्त महिला करताना दिसून आली.

**सुचना :**

१) हुंडाबळीचा कायदा झाला परंतु त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी महिलांनी स्वत:हुन पुढे येण्याची आवश्यकता आहे.

२) स्त्री—पुरूष समानता सामाजिक मानसिकता निर्माण करणे आवश्यक आहे.

३) महिलांनी आर्थिक बाबतीत स्वालंबी व आत्मनिर्भर झाल्यास कौटुंबिक हिंसाचार निश्चितच कमी होईल.

४) स्त्रीयांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्याच्या पतीने दयावे.

**संदर्भ :**


१. अहंकारी सशिकांत, स्त्रिया आणि कौटुंबिक हिंसा हॅलो मेडिकल २००६, फाऊंडेशन, अणदुर उस्मानाबाद.

२. प्रकाश जाधव, नजिर शेख व इतर २०१२, जागतिकीकरण : वंचित घटकातील महिला समारील आव्हाणे, अरूणा प्रकाशन लातूर.

३. प्रिति वडनेकर २००९, कौटुंबिक हिंसाचार एक जळजळीत वास्तव मिळूण साऱ्याजणी, मणिषा पब्लिकेशन मुंबई.

४. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नाची वाटचा, प्रतिभा प्रकाशन.

# EFFECT OF KAPALBHATI PRANAYAM ON WEIGHT OF HIGH SCHOOLGIRLS

Dr. Rajendra Lolage
Director of Physical Education, Elphinston College Mumbai
Email- **rslolage@gmail.com**
Dr. Narayan Jadhav
Director of Physical Education, Arts,com & sci college lasalgaon

**Abstract :-**
The purpose of the study was to measure the effect of Kapalbhati Pranayama on Weight of highschool Girls. This experiment therefore included forty (N=40) Highschool girls age ranged from 12-15 from Sharada Kanya Vidya Mandir highschool Aurangabad. The subjects were divided in to two groups i.e. control group (n=20) and experimental group (n=20) Initial test of Weight Test was conducted to all subjects. In training of Mudra, I have included OMstawan, Vayu Mudra Anulom-vilom, Kapalbhati, Bhramari, Ujjayi Pranayama, OM recitation, and Yoganidra. In evening sixty min for each session of the day. Although the subject of control group did not practice in the above programmed, they are kept busy with interesting activity separately during the experimental period. After one month, training of Mudra final test was conducted for the entire subjects. The obtained data would statistically analyzed by using T ratio. It was found that the practice of Mudra was improved the Weight of high school girls.

Key Words - Kapalbhati Pranayama, Weight and high school girls.

## INTRODUCTION

Weight is the most important component of any person to survive in this world. **Kapalbhati Pranayama** play vital role in increse Weight. **Kapalbhati Pranayama** have positive influence in increase Weight but to what extent is not known.

A **Kapalbhati Pranayama** is a great gift that has its origin in Indian civilization. One side it is a science to convert ordinary person into adevine personality and on the other hand it provides ways for salvation.

STATEMENT OF PROBLEM :- To study effect of **Kapalbhati Pranayama** on Weight of Highschool girls from Sharada mandir kanya mandir Aurangabad.

## OBJECTIVE OF THE STUDY: --

The objective of this study reported here as follows.

1. To measure the Weight of Highschool girls Sharada kanya mandir Aurangabad before the commencement of experiment.
2. To introduce training program of Mudra among the selected highschool girls. Sharada kanya mandir girls Aurangabad as a treatment stimulus.
3. To measure the Weight of the subjects after completion of treatment stimulus.
4. To examine the treatment effect of **Kapalbhati Pranayama** on Weight as measuring by Weight test.
5. To compare the efficacy of **Kapalbhati Pranayama** on Weight as measured by Weight Test.

## HYPOTHESIS: -

There is a significant difference between the Weight of the Highschool girls. Measured before and after the Mudra session.

## SCOPE OF THE STUDY:--

- The study is limited to the Effect of **Kapalbhati Pranayama** on Weight of Sharada kanya mandir girls only.
- The researcher deals with Weight of Highschool girls..
- The study deals with the relationship between the **Kapalbhati Pranayama** and Weight of Highschool girls..

## METHODS: --

Experimental methods will be used. For the study, informal experimental design will be considered. The present investigation is an experimental study designed with parallel group (Hubbard, 1973) to see the effect of Mudra on Weight of Highschool girls. Sharada kanya mandir highschool Aurangabad formed the population purposive sampling technique at the beginning, is designed so as to select the sample from the Sharada kanya mandir high school Aurangabad. A total forty subjects (N = 40) assigned randomly in to two equally matched groups on the basis of result of Weight test. The subjects of the two distributed groups are named as Experimental group (N = 20) and Control group (N =20)

## THE WHOLE EXPERIMENT WAS CONDUCTED BY THREE PHASES

1$^{st}$ phase (i.e. pre test) in this phase of pre test the subject of the both the experimental and control groups were instructed to participate in Weight test.

2$^{nd}$ phase (i.e. Treatment/training phase) The subject of experimental groups will participate in the respective training sessions daily 1 hour in the evening session expect Sunday and holidays for a total period of two week, the subject of the control group will not participate in any of the training sessions.

3$^{rd}$ phase (i.e. posttest) in this phase all the data will be collected as per the procedure as mentioned in the pretest.

## FINDINGS

The findings of the present study were as follows:

1. The results of this study indicate that Weight Test used for measuring Weight could show the improvement due to the effect of **Kapalbhati Pranayama**.

Although there was no change observed in the pre and posttest Mean of Weight of control group.

The above results in turn indicate that there were significant differences in experimental group and control group. Thus the hypothesis is accepted.

## CONCLUSION:-

The findings of the study appear to warrant the following conclusions

- Pranayama is useful in improving Weight of Sharada kanya mandir high school Aurangabad training high school girls.selected for this study.

## REFERENCE: -

**[1]** AcharyaBalkrishna. (2007). Yog in Synergy with Medical Science. (2nd Ed) Hardwar: DivyaPrakashanDivyaYogMandir Trust KripaluBagh Ashram Kankhal Hardwar.

[2] August colenbrander. (1988) Visual acuity measurement standard. Italian journal of ophthalmology

[3] Ayyangar. B.K.S. (2007) Yoga for All. Pune: Rohan Publication.

[4] Best John W. and Khan James V.(1986). Research in Education.(6th Ed). Toronto: Prentice Hall of Canada .

[5] Bhole .M.V. (1985) Abstracts and Bibliography of Articles on Yoga. Lonavla: Kaivalyadhama S.M.Y.M. SamitiLonavla

[6] Buch. M.B.(Ed). (1991). Sixth Survey of Research in Education(1993-2000), New Delhi: vol. II, NCERT, New Delhi.

[7] Clarke, H. H. & Clarke, D. H. (1987). Application of measurement to physical education (6th Ed). N. J Prentice Hall, Inc.

[8] Jadhav K.G., et al (2007). Research Process in physical education & sports: An Introduction. New Delhi: Khelsahitya Kendra.

[9] Kamalesh M.L. (2006) Methodology of research in physical education and sports(3rded). New Delhi: Metropolitan Book Co. Pvt. Ltd

[10] Kuvalayananda, Swami. (1966). Pranayama. Bombay: Bombay Popular Prakashan, 35 C, Tardeo Road.

*"Go to the people,*
*Live among them,*
*Learn from them,*
*Love them.*
*Start with what they know*
*Build on what they have"*

**BOOK-POST**

To, ______________________________

______________________________

______________________________

______________________________




Printed and Published by Dr.Prakash B. Jadhav, Principal, Manavlok's College of Social Sciences, Ambajogai, Post Box No.23, Ring Road, Ambajogai Dist. Beed, Pin-431517 (MS) at AAI offset, Shop No. 11, Raje Shivchhatrapati Vyapari Sankul, Ambajogai, Dist. Beed.